|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ४० सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२० ते रविवार दि. २७ सप्टेंबर २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पैसा नाही उपचारांना रिकामी झोळी कोरोनाग्रस्तांवर आत्महत्येची पाळी

पालघर/क्राईम रिपोर्टर



कोरोनाचा प्रादुर्भाव प्रचंड वाढल्याने सरकारी रुग्णालये फुल झाली आहेत, तर खाजगी रुग्णालयांकडून लुटमार सुरु आहे. कोविड सेंटरमध्ये ऑक्सिजन आणि व्हेंटिलेटचा तुटवडा जाणवतोय. त्यामुळे कोरोनाग्रस्तांचे प्रचंड हाल सुरु आहेत. एकीकडे कोरोन झालेल्यांना मरणाची भीती तर दुसरीकडे उपचार अभावी होत असलेले हाल, यामुळे काही कोरोना बाधितांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवलेय. बोईसरमध्ये अशाच एका कोरोनाग्रस्ताने रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरून खाली उडी घेवून जीवन संपवल्याने खळबळ माजली आहे.

पालघर जिल्ह्यातील बोईसर येथे रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या एका रुग्णाने रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. आज पहाटे ही धक्कादायक घटना घडली असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे. बोईसरच्या भीमनगर जवळील चिन्मय हॉस्पिटलमध्ये चंद्रकांत चौधरी यांना दाखल करण्यात आले होते. गेल्याक काही दिवसापासून त्यांची प्रकृती ठिक नव्हती. त्यामुळे त्यांच्यावर या रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र चौधरी यांनी आज पहाटे ६ वाजून ४५ मिनिटाने रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील छतावर जाऊन थेट खाली उडी मारली. छतावरून काही तरी पडल्याचा जोरदार आवाज झाल्याने रुग्णालयातील कर्मचारी तात्काळ रुग्णालयाबाहेर धावले असता त्यांना चौधरी यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. या घटनेनंतर तात्काळ बोईस एमआयडीसी पोलिसांना त्याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन माहिती घेत गुन्हा नोंदवला आहे. चौधरी यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना चिन्मय हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांच्या प्रकृतीत ...पान २ वर

# पैशासाठी झाला रक्ताच्या नात्यावर वार नातवानेच केले आजी - आजोबाला ठार

जळगाव/क्राईम रिपोर्टर

पैशासाठी माणूस कोणत्या थरला जाईल याचा आजकाल नेम नाही. पैशासमोर दोस्ती यारी अगदी रक्ताची नाती सुद्धा फिकी पडतात. त्यामुळे धन संपत्तीच्या मोहातून मुलाने वडिलांचा किंवा भावाने सख्या भावाचा जीव घेतल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. रोझोदा गावात एका कर्जबाजारी नातवाने चक्क आपल्या चुलत आजोबाचे घर लुटताना प्रतिकार करणाऱ्या वृद्ध आजी आजोबाला ठार मारले. विशेष म्हणजे एवढं सगळ करूनही त्यांच्या अंत्यसंस्काराची तयारी करण्यापासून ते पोलिसांना जबानी देण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीत पुढे होता. पण पोलिसांना चकवण्याचा त्याचा हा प्रयत्न घटनास्थळी सापडलेल्या एका मळकट रुमालामुळे फसला आणि हा खुनी नातू पोलिसांच्या जाळ्यात अडकला.







ओंकार पांडुरंग भारंबे हे ग्रामसेवक होते. राज्य शासनाची सेवा केल्यानंतर ते सन १९९२ मधे सेवानिवृत्त झाले. ओंकार भारंबे यांच्याकडे जवळपास ५ ते ६ एकर शेती होती. सेवानिवृत्तीनंतर त्यांना शासनाकडून पेन्शन मिळत होते. त्यांच्या दोन्ही मुलांना मुंबईत चांगल्या पदावर नोकरी मिळाली. त्यामुळे त्यांची दोन्ही मुले मुंबई येथेच स्थायिक झाली. एकंदरीत ओंकार भारंबे व त्यांची पत्नी सुमन भारंबे या दाम्पत्याने आपल्या जीवनातील सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्या होत्या. त्यांचे उर्वरीत जीवन व्यवस्थित सुरु होते. दोन्ही मुले मुंबईत असली तरी ओंकार भारंबे व त्यांची पत्नी सुमन भारंबे हे जेष्ठ नागरिक दाम्पत्य आपल्या गावी रोझोदा येथे रहात होते. ओंकार भारंबे यांचे वय ८० तर त्यांची पत्नी सुमन भारंबे यांचे वय ७५ होते. वय झाले तरी दोघा जेष्ठ नागरिक दाम्पत्यांनी आपली तब्येत ब-यापैकी सांभाळली होती. वेळच्या वेळी ते आपल्या तब्येतीची काळजी घेत होते. वयोमानानुसार ओंकार भारंबे यांना चालण्यासाठी वॉकर लागत होते. त्यामुळे ते ...पान २ वर

## दारूच्या नशेत त्याला काहीच नाही कळले पत्नीला वाचवायला आलेल्याला जिवंत जाळले



बदलापुर/क्राईम रिपोर्टर

महिलांच्या भांडणात सहसा पुरुषाने पडू नये आणि पडले तरी संयम राखून वाद मिटवण्याचा प्रयत्न करायला हवा. पण जे लोकं दारुडे असतात त्यांना अशा भांडणाचे निमित्त हवे असते आणि मग एकदा का त्यांच्या डोक्यात दारूची नशा गेली कि मग नशेत त्यांच्या हातून काहीही घडू शकते. बदलापूरमध्ये अशाच एका घटनेत आईबरोबर भांडण करणाऱ्या महिलेला धडा शिकवण्यासाठी गेलेल्या दारुड्या इसमाने त्या महिलेला आणि तिच्या मुलाला बेदम मारहाण केली आणि त्यांना वाचवायला आलेल्या त्या महिलेच्या पतीला पेट्रोल ओतून जिवंत जाळले. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

वांगणी शेजारी असलेल्या डोणे गांवात किरकोळ कारणावरुन झालेल्या भांडणातुन चंदकांत पवार (४८) याना निखिल गुरव याने पेट्रोल टाकुन जिवंत जाळन्याचा धक्कादायक प्रकार घडला असुन यात पवार यांचा मृत्यु झाल्याने बदलापुर ग्रामिण पोलिसानी गुरव याला अटक केली आहे. तर या आरोपीवर ...पान २ वर

## शेत मालकाचा राग खूपच अनावर झाला म्हशीने वैरण खाताच मालकाचा खून केला

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

शेती आणि त्यालाच सलग्न असलेला पशुपालन व्यवसाय हीच प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या उपजीविकेची साधने असतात. त्यामुळे ग्रामीण भागातील सर्व वाद हे शेतीशी निगडीत असतात. मात्र कधी कधी असे वाद मिटवण्यात यश येते तर कधी कधी अशा वादातून सुडाने पेटलेले शेतकरी एकमेकांच्या जीवावर उठतात आणि त्यातूनच एखाद्याचा जीव जातो. कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुकली गावात दुसऱ्याच्या शेतातली म्हशीने वैरण खाल्ली या रागातून शेतमालकाने म्हशीच्या मालकाची निर्घुणपणे हत्या केली आणि सरळ पोलीस ठाण्यात हजर झाला. या घटनेमुळे गावात मोठी खळबळ माजली आहे.



मयत किशोर





आरोपी किरण

करवीर तालुक्यातील कुरूकली हे गाव सधन शेतकऱ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. गावात मराठा पाटील समाजाची वस्ती जास्त आहे. प्रत्येकांची थोडी फार शेत जमीन आहे. त्याच बरोबर लहान मोठया पाटलांनी दुभती जनावरे ही पाळली आहेत. शेतीबरोबरच दूध व्यवसाय हा शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी पशुधनाकडे वळालेले आहेत. शेतकरी भोगावती नदीकाठी या गावातील बऱ्याच लोकांची शेती आहे.या शेतील मळीची शेती म्हटले जाते. या मळीच्या शेतीत अनेक शेतकरी आपआपल्या हक्काने जनावरासाठी वैरण करीत असतात. वर्ष भर जनावरांना वैरण पुरेल अशा पध्दतीने वैरणीची बेजमी असते.या आपल्या हक्कातील मळीच्या शेतीत बहुतांश शेतकरी हे दुसऱ्याच्या जनावरांना चरण्यासाठी येऊ देत नाहीत. चुकून एखाद्याची म्हैस दुसऱ्याच्या मळीत वैरण चरण्यासाठी गेली तर त्यातून भांडणे ही ठरलेलीच असतात. तर कुणी आपल्या हक्काच्या मळीतील गवत ...पान २ वर

## लग्न ठरताच त्याच्या डोक्याचा ताप वाढला समलिंगी तरुणाने जोडीदाराचा काटा काढला

मुंबई/राजेंद्र वेदांते

सर्वोच्च न्यायालयाने भलेही कलम ३७७ रद्द करून समलिंगी संबंधाना अप्रत्यक्ष मान्यता दिलेली असली तरी समाजात मात्र अशा संबंधाना किंवा असे संबंध ठेवणाऱ्यांना अजिबात मान नाही. त्यांच्याकडे तुच्छतेने पहिले जाते. कारण समलिंगी संबंध म्हणजे एक प्रकारची विकृती आहे असे आजही भारतीय संस्कृतीत आणि समाज व्यवस्थेत मानले जाते. तरीही काही लोकं समलिंगी संबंध ठेऊन आहेत. मात्र अशा संबंधाना फार काळ भविष्य नसते. त्यामुळे आकर्षण संपले कि सारे काही संपते. मुंबईतील एका पालिका अधिकाऱ्याचे एका तरुणाशी समलिंगी संबंध होते. मात्र त्याचे लग्न ठरल्याने त्या तरुणाने ते संबंध तोडून टाकले. पण त्याचा समलिंगी परतणार नसल्याने तो अधिकारी मात्र त्याची पाठ सोडायला तयार नव्हता. अखेर त्या तरुणाने मित्राच्या मदतीने त्या अधिकाऱ्यांचा काटा काढला.

अशोक राऊत वय ४५ (नाव बदलेले आहे) हे मुंबई महानगरपालिकेत वरीष्ठ पदावर कार्यरत होते. इमाने इतबारे नोकरी करीत आपले घर आणि संसार ऐवढेच त्यांचे जग होते. प्रत्येकाशी त्यांचे सलोख्याचे संबध होते. अजातशत्रू होते ते. ...पान २ वर

## शुल्लक वाद प्राणावर बेतला शाहरुखने त्याचा जीवच घेतला





मयत अल्तमश

जळगाव/क्राईम रिपोर्टर

अपमानाच्या आगीत जळणारा माणूस सुडाने पेटलेला असतो आणि जेंव्हा तो त्याला अपमानित करणाऱ्याचा सूड घेतो तेंव्हाच त्याच्या ह्रदयात धगधगत असलेली आग शांत होते. सुडाने पेटलेल्या माणसाला परिणामाची चिंता नसते त्याची कोणत्याही थराला जाण्याची तयारी असते. जिथे तो मित्र बघत नाही किंवा नात्याची परवा करीत नाही तिथे इतरांचे काय. भुसावळमध्ये शुल्लक वादातून अल्तमशने शाहरुखच्या कानाखाली मारली. मात्र त्यामुळे अपमानित झालेला शाहरुख इतका चिडला कि त्याने तोच राग मनात ठेवून संधीची वाट पाहू लागला आणि एकेदिवशी सुडाने पेटलेल्या शाहरुखने साथीदारांच्या मदतीने अल्तमश याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी शाहरुख व त्याच्या साथीदारांना अटक केली आहे.



आरोपी

भुसावळ शहरातील जाम मोहल्ला भागात शाहरुख युसूफ शेख व अल्तमश रशीद शेख हे दोघे तरुण रहात होते. रविवारी सायंकाळी दोघा तरुणात किरकोळ कारणातून वाद झाला. या वादाचे पर्यावसन दोघामधे हाणामारीत झाले. या हाणामारीदरम्यान अल्तमश शेख याने शाहरुख शेख याच्या कानशिलात लगावली. आपल्या कानशिलात लगावल्यामुळे शाहरुख यास काहीवेळ सुचलेच नाही. त्याच्या डोळ्यासमोर काजवे चमकू लागले. कानशिलात मार बसल्याचा राग शाहरुखच्या मनात घर करुन बसला होता. ...पान २ वर

## मैत्रिणी विरुद्ध भलतेच करून बसला इंजिनियर पोलिसांच्या जाळ्यात फसला

मुंबई/एस.कुमार

कोणतेही तंत्रज्ञान हे माणसाच्या विकासासाठी असते. पण काही लोकं त्याचा दुरुपयोग करून दुसऱ्यांना फसवण्याचे काम करीत असतात. मात्र काळव्यात राहणाऱ्या एक अभियंत्याने चक्क मैत्रिणीवर सूड उगवण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करून तिला त्रास देवू लागला आणि तेही केवळ त्याच्या मैत्रिणीने दुसऱ्या मित्रांसोबत फोटो काढले म्हणून त्याला राग आला आणि याच रागातून तिला धडा शिकवण्यासाठी त्याने इन्टाग्रामवर बनावट खाते तयार करून त्यावर तिचे खाजगी फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन तिचा छळ करू लागला. अखेर या प्रकरणी तिने पोलिसांकडे धाव घेताच पोलिसांनी मोठ्या शिताफीने या माठेफिरूचा शोध घेऊन त्याला अटक केली.

बोरीवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत रीना (काल्पनिक नाव) नावाची २३ वर्षाची तरुणी राहत होती. ती सुशिक्षित आणि सुंदर होती.ती कुटुंबातील सदस्य सोबत राहत होती. एके दिवशी तिला एका अनोळखी तरुणाने बनावट इन्स्टाग्राम अकांऊटवरून तिचे खाजगी फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली व तिला शिवीगाळ केली.तो एवढया वरच थांबला नाही तर त्याने ...पान ६ वर

## अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट झाला पत्नीच्या याराचा पतीनेच खून केला

सांगवी/क्राईम रिपोर्टर



मयत

पहिले प्रेम हे सहसा कुणालाही विसरता येत नाही. त्यामुळे ज्या तरुण तरुणींचे निस्सीम प्रेम असते पण घरच्या लोकांच्या विरोधामुळे त्यांचे लग्न होऊ शकलेले नसते. अशा मुलीचे दुसऱ्याशी लग्न झाले तरी ती आपल्या प्रियकराला विसरू शकत नाही आणि लग्नानंतरही त्यांच्या गाठीभेटी सुरूच असतात. पण जेंव्हा अशा अनैतिक संबंधाची चुणूक तिच्या पतीला लागते, तेंव्हा मात्र संसारात आग लागते आणि या आगीत त्याचा किंवा तिचा बळी जातो. पण सांगवी येथे मात्र प्रेमाच्या त्रिकोणात पत्नीच्या प्रियकराचा तिच्या पतीनेच बळी घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला त्याच्या साथीदारासह अटक केली आहे.



पुणे शिवाजीनगर परिसरात आय्याज शेख हा राहतो. तो एका ठिकाणी काम करीत होता. गेल्या दोन तीन वर्षापूर्वीच त्याचे लग्न समाजातील रेहना (काल्पनिक नांव) हिच्याशी झाले होते. ती दिसायला सुंदर आणि देखणी होती. आपल्याला अनुरूप बायको मिळाली म्हणून आय्याच ही खुश होता. तिच्यावर तो मनापासून प्रेम करीत होता. तिला काय हवे काय नको ते बघत होता. दोघांचा संसार मजेत आणि सुखात चालला होता. परंतु अलिकडे रेहान ही मोबाईलवरून तासन तास कुणाशी तर बोलत होती.सुरूवातीला त्याला वाटले की नवीन लग्न झाले असल्याने आपल्या ...पान ६ वर

## दारू पिऊन जाब विचारायला जाताच राडा झाला दोघे जखमी झाले तर एक जण जीवानिशी गेला

डोंबिवली/क्राईम रिपोर्टर

दारू माणसाच्या पोटात गेली कि मग त्याला नको नको त्या गोष्टी आठवतात आणि दारूच्या पार्टीत तर मेलेली मढी उकरून काढून त्यातून वाद घातले जातात आणि याच वादातून पुढे एखाद्याचा जीव जातो. डोंबिवलीत अशीच एक घटना घडली आहे. मुलीच्या वाढदिवसानिमित झालेल्या पार्टीत पाच महिन्यापूर्वी दिलेल्या शिवीगाळीचा विषय निघाला आणि त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या तिघांवर समोरच्या इसमाने आपल्या साथीदाराच्या मदतीने केलेल्या हल्ल्यात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दारूच्या पार्टीचे आयोजन करणारा आणि त्याचा मेव्हणा गंभीर जखमी झाले असून पोलिसांनी या प्रकरणी ५ जणांना अटक केली आहे.



पाच महिन्यांपूर्वी केलेल्या शिवीगाळीचा वाद उफाळून आल्यानंतर झालेल्या सशस्त्र हाणामारीत एक जण जागीच ठार, तर मेहुणा-भावोजी असे दोघे जायबंदी झाले.

ही घटना डोंबिवली पूर्वेकडील दत्तनगरमध्ये गुरूवार-शुक्रवारच्या मध्यरात्री घडली. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असतानाच पोलिसांनी १२ तासांच्या आत पाचही खुन्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. महेश दिलीप गुंजाळ (२२), निखिल सुरेश माने (२३), जयेश अशोक जुवळे (२२), ...पान ६ वर

21 TO 27 SEPTEMBER 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 19/09/2020 6:53 PM Page 1



## पान १ वरून....

### पैशासाठी झाला रक्ताच्या नात्यावर...

कधी घरातील पलंगावर तर कधी घराच्या बाहेर ओट्यावर बसत असत. वयोमानानुसार त्यांना ऐकू देखील कमी प्रमाणात येत होते. जळगाव जिल्हयाच्या रावेर तालुक्यातील रोझोदा या गावी हे भारंबे दाम्पत्य रहात होते. रोझोदा येथे ते आपली शेती व घर सांभाळत होते. ते रहात असलेल्या घराजवळ एका परिवाराला कोरोनाची बाधा झाली होती. त्यामुळे ते रहात असलेला परिसर कंटेन्मेंट झोन म्हणून जाहीर झाला होता. या परिसरातील प्रत्येक घरातील सदस्यांची दररोज नियमीतपणे कोरोना तपासणी केली जात होती. दररोज सकाळी आरोग्यसेवक या परिसरात घरोघरी जावून प्रत्यकाची ऑक्सीजन लेव्हल व तपमान तपासत होते. जेष्ठ नागरिक भारंबे दाम्पत्य रहात असलेल्या घराजवळच परेश खुशाल भारंबे हा ३२ वर्ष वयाचा तरुण रहात होता. तो नात्याने या भारंबे दाम्पत्याचा चुलत नातू होता. वयोवृद्ध ओंकार भारंबे घराबाहेर ओट्यावर बसण्यास आले म्हणजे परेश देखील त्यांच्याजवळ येवून बसत असे. त्यामुळे नात्याने आजोबा असलेले ओंकार भारंबे व नातू परेश यांच्यात नेहमी इकडचे तिकडचे संभाषण होत असे. त्यातून परेश यास ओंकार भारंबे यांच्या बऱ्याच गोष्टी माहीत झाल्या होत्या. पेन्शनर असलेले ओंकार भारंबे यांनी कधी पेन्शन घेतली? किती घेतली असेल? त्यांच्या घरात किती रक्कम शिल्लक असेल? याचा अंदाज व मागोवा परेश घेत असे. परेश हा इंजीनिअरींग डिप्लोमाच्या दुसऱ्या वर्षाचा ऑपीअर विद्यार्थी होता. त्याला दारु पिण्याचे व्यसन होते. तसेच त्याचावर जवळपास दोन ते अडीच लाख रुपयांचे कर्ज असल्याचे देखील समजते. आपल्यावर असलेले कर्ज फेडण्याची परेश यास चिंता होती. त्यातच त्याला दारु पिण्याचे देखील व्यसन होते. कर्ज फेडण्यासाठी त्याला पैशांची गरज होती. नात्याने आजोबा लागणाऱ्या ओंकार भारंबे यांच्या घरात किमान पन्नास हजार रुपये असतीलच असा पक्का अंदाज परेश याने घेतला होता. ते पैसे आपल्याला मिळाले तर आपली आर्थिक अडचण दूर होवू शकते असा विचार परेश याने मनाशी केला होता. त्यादृष्टीने तो अजून माहिती घेण्यासाठी ओंकार भारंबे यांच्याशी जवळीक साधून होता. तो त्यांच्या घराजवळच रहात होता. ओंकार बाबा घराच्या ओट्यावर येवून बसले म्हणजे परेश देखील त्यांच्याजवळ येवून त्यांची विचारपूस करण्यास येवून बसत असे. कर्ज फेडण्यासाठी ओंकार बाबा यांच्या घरातून रात्री पैसे व दागिने चोरी करण्याची आयडीया त्याच्या मनात आली. दोघांना जाग आल्यास ठार करण्याचा कुविचार देखील परेशच्या मनात सतत येत होता. त्याच्यावर असलेला कर्जाचा डोंगर त्याला स्वस्थ बसू देत नव्हता. त्यामुळे त्याच्या मनात कुविचारांनी थैमान घातले होते. त्यामुळे तो अस्वस्थ रहात होता. अखेर भारंबे दाम्पत्यांसाठी ती काळरात्र जवळ आली. नात्याने आपला चुलत नातूच काळ बनून आपला जीव घेणार असल्याची कल्पना या जेष्ठ नागरीक दाम्पत्याला कशी येणार होती? नियतीची लेखणी कुणाला माहीत नसते. नियतीचा लेखा जोखा केवळ नियतीलाच माहीत असतो. आपल्या जीवनात पुढे काय वाढून ठेवले आहे हे कुणालाही माहिती नसते. त्यामुळे वृद्धापकाळात जीवन व्यतीत करणा-या भारंबे दाम्पत्याला देखील नियतीचा लेखाजोखा माहीती नव्हता. बुधवार दि. ९ सप्टेंबरच्या मध्यरात्री निरव शांततेत कुविचाराने ग्रासलेल्या परेश भारंबे याने सुरीसह चोरपावलांनी ओंकार भारंबे यांच्या घरात प्रवेश केला. ओंकार भारंबे यांना निट चालता येत नाही व ऐकू देखील कमी येते या गोष्टीचा गैरफायदा घेण्याचे परेशने ठरवले होते. घरातील पैशांची शोधाशोध करत असतांना सुमन भारंबे या आजीला जाग आली. आजी सुमन भारंबे यांना जाग आल्यामुळे त्याने सर्वप्रथम सुरीसह आपला मोर्चा वयोवृद्ध सुमन भारंबे यांच्याकडे वळवला. नात्याने आजी असलेल्या वयोवृद्ध सुमन भारंबे या आजीच्या गळ्यातील मण्यांची पोत व हातातील बांगड्या त्याने हिसकावून घेतल्या. सुमन भारंबे या आजीने त्याला प्रतिकार करण्यास सुरुवात केली. मात्र त्या वयोवृद्ध असल्यामुळे त्यांचा प्रतिकार कमी पडला. कुणाला समजू नये त्यापुर्वीच त्याने हातातील सुरीने त्यांच्या पोटावर व गळ्यावर सपासप वार केले. त्यामुळे त्या रक्ताच्या थारोळ्यात स्वयंपाक खोलीत पडल्या. त्या आवाजाने झोपलेल्या ओंकार महाजन यांना जाग आली. तेवढ्या वेळात त्यांची पत्नी सुमन यांची हत्या झालेली होती. ओंकार भारंबे यांना निट चालता येत नव्हते. त्यांना चालण्यासाठी वॉकरची मदत घ्यावी लागत असे. त्यामुळे त्यांची हत्या करणे परेश यास सोपे गेले. परेशने त्यांची देखील सुरीने हत्या केली. त्यानंतर परेशने घरातील शिल्लक असलेले ५४ हजार ३४० रुपये रोख ताब्यात घेतले. रोख रक्कम, तुटलेल्या मण्यांची पोत व बांगड्या असा ऐवज घेवून त्याने गुपचूप तेथून पोबारा केला. दोघा जेष्ठ नागरीक दाम्पत्यांची हत्या केल्यानंतर परेश आपल्या घरी आला. मात्र त्याचा मळकट रुमाल घटनास्थळावर राहून गेला. हा रुमाल पुढील पोलिस तपासात एक महत्वाचा दुवा ठरला. त्यानंतर गुरुवार १० सप्टेबरचा दिवस उजाडला. सकाळी सर्व जण आपापल्या कामाला लागले. नेहमीप्रमाणे गावातील आरोग्य उपकेंद्राचे आरोग्यसेवक हारुन काझी कोवीड रुग्णांच्या तपासणीसाठी परिसरातील कंटेन्मेंट झोनमधे तपासणीसाठी आले. सकाळी साडेदहा वाजता आरोग्यसेवक भारंबे दाम्पत्याच्या घरी पोहोचले. त्यावेळी त्यांना घराचा दरवाजा लोटलेला दिसला. सुरुवातीला आरोग्यसेवक हारुन काझी यांनी ओंकार बाबा यांना बाहेरुन आवाज दिला. दोन ते तीन वेळा आवाज देऊनही घरातून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आरोग्यसेवक काझी यांनी दरवाजा हळूच उघडला. समोर दिसलेले भयावह चित्र बघून आरोग्यसेवक काझी यांना शॉक बसला. दोघे जेष्ठ नागरिक दाम्पत्य रक्ताच्या थारोळ्यात पडलेले त्यांना दिसून आले. ओंकार भारंबे यांचा मृतदेह बेडरुममध्ये तर सुमनबाई यांचा मृतदेह स्वयंपाक घरात पडलेला होता. आरोग्यसेवक काझी यांनी तात्काळ या घटनेची माहिती सरपंच व पोलिस पाटील वासुदेव हिवरे यांना दिली. पोलिस पाटील यांनी घटनास्थळावर येवून घटनेची खात्री करुन घेतली. दरम्यान घटनास्थळावर परिसरातील नागरिकांची गर्दी जमली होती. पोलिस पाटील हिवरे यांनी या घटनेची माहिती सावदा पोलिस स्टेशनला दिली. दुहेरी खूनाची माहिती मिळताच स.पो.नि. राहुल वाघ यांनी आपल्या सहका-यांसह घटनास्थळी धाव घेतली. या घटनेबाबत त्यांनी वरिष्ठांना कळवले. गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस अधीक्षक डॉ. पंजाबराव उगले, अप्पर पोलीस अधीक्षक भाग्यश्री नवटके यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देत गुन्हा उघडकीस आणण्याकामी स.पो.नि. राहुल वाघ यांना योग्य त्या सुचना व मार्गदर्शन केले. या घटनेप्रकरणी सावदा पोलिस स्टेशनला अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ३५/२० भा.द.वि.३०२ नुसार दाखल करण्यात आला. या गुन्ह्याच्या तपासकामी डीवायएसपी गजानन राठोड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक बापू रोहोम, सावदा पोलीस स्टेशनचे स.पो.नि. राहुल वाघ,पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पवार, पो.हे.कॉ. पांडुरंग सपकाळे, विनोद पाटील,पो.ना.रिजवान पिंजारी, देवेंद्र पाटील, सुरेश अढायगे, संजीव चौधरी, मेहरबान तडवी, हेमराज भावसार, जगदिश पाटील, बाळु मराठे, विशाल खैरनार, योगेश सावळे, डॉग स्कॉडचे पो.ना.शेषराव राठोड, मनोज पाटील , फॉरेन्सिक युनिट मधील पो.ना.किरण चौधरी, योगेश वराडे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक सुधाकर लहारे, सहायक फौजदार राजेंद्र पाटील, विजय पाटील, शरीफोद्दीन काझी,अनिल इंगळे, राजेश मेंढे, संजय हिवरकर,रमेश चौधरी, संतोष मायकल, युनुस शेख, किशोर राठोड, नंदलाल पाटील, अरुण राजपुत, राहुल पाटील, नरेंद्र वारुळे आदींचे पथक तपासकामी स्थापन करण्यात आले. दरम्यान एका खबऱ्याने स.पो.नि. राहुल वाघ यांना गोपनिय माहिती दिली की रोझोदा गावातील परेश खुशाल भारंबे हा तरुण मयत ओंकार पांडुरंग भारंबे यांच्या घराजवळ रहात असून तो नेहमी त्यांच्या घरासमोर बसत होता. तो इंजिनिअरिंग डिप्लोमाच्या सेकंड ईयरचा ऑपीयर विद्यार्थी असून त्याच्यावर व्यसनाधिनतेमुळे जवळपास दोन ते अडीच लाख रुपयांचे कर्ज झाले आहे. मयत ओंकार भारंबे यांच्याशी जास्त जवळीक साधणारा तोच तरुण होता. घटनेच्या आदल्या रात्री बराच वेळ दोघे मयत व परेश असे सोबत गप्पा करत बसले होते. या माहितीच्या आधारे सहायक पोलिस निरिक्षक राहुल वाघ यांनी परेश याच्यावर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. त्याच्या प्रत्येक हालचाली स.पो.नि. राहुल वाघ आपल्या पारखी नजरेने टिपत होते. मात्र त्याच्यावर आपला संशय असल्याचे स.पो.नि. राहुल वाघ यांनी त्याला समजू दिले नाही. अंत्यविधीच्या सामानाची जमवाजमव करण्यासाठी परेशने लगबगीने धावपळ देखील सुरु केली होती. बोळवण आणणे, मंडप टाकणे, गोवऱ्या आणणे आदी कामे त्याने मोठ्या लगबगीने करण्यास सुरुवात केली होती. आपल्यावर कुणाचा संशय येवू नये हा त्याचा हेतू होता. मात्र आपल्यावर स.पो.नि. यांची पारखी नजर आहे हे त्याला समजू शकले नाही. घटनास्थळ असलेल्या मयत भारंबे दाम्पत्यांच्या घरात एक मळकट रुमाल पोलिस पथकाला आढळून आला. मयत ओंकार भारंबे यांचे घर अतिशय टापटीप व नीटनेटके असतांना हा मळकट रुमाल याठिकाणी कसा आला? तो रुमाल कुणातरी परक्या व्यक्तीचा असावा अशी शंकेची पाल पोलिसांच्या मनात चुकचुकली होती. जळगाव येथून बोलावलेल्या हॅपी या श्वानाला प्रशिक्षक शेषराव राठोड व मनोज पाटील यांनी हा मळकट रुमाल दाखवला. त्या मळकट रुमालाचा वास घेतल्यानंतर श्वानाने आपला मोर्चा थेट परेश भारंबेच्या घरात नेला. तेथून पुढे शेजारी पडक्या घरात असलेल्या नोटांच्या बंडलाजवळ श्वानाने धाव घेतली. पोलिसांनी याच पुराव्याच्या आधारे परेशला चौकशीकामी ताब्यात घेतले. सुरुवातीला आपल्याला काहीच माहिती नाही असे म्हणणारा परेश खाकीचे रत्न बघताच कबुल झाला. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला त्याला पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान त्याने आपला गुन्हा कबुल करत रोख रक्कम ५४ हजार ३४० रुपये रोख, बांगड्या असा ऐवज काढून दिला. त्याने सुमन भारंबे यांच्याकडून हिसकावून घेतलेल्या बांगड्या या नकली अर्थात बेन्टेक्सच्या होत्या. त्या खऱ्या असल्याचे त्याला वाटले होते. या बांगड्यांची चांगली किंमत मिळू शकते असा त्याला विश्वास वाटत होता. या गुन्ह्यात पोलिसांनी अटकेतील परेश याच्याकडून रोख रक्कम, सुरी व इतर मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्हा उघडकीस आल्यानंतर त्याच दिवशी या गुन्ह्याचा तपास पुर्ण करण्यात व आरोपी अटक करण्यात पोलिस पथकाला यश आले.

### पैसा नाही उपचारांना रिकामी झोळी...

सुधारणा होत असल्याने त्यांना सामान्य वॉर्डात शिफ्टही करण्यता आले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून चौधरी यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे, असं सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील यांनी सांगितलं. दरम्यान, चौधरी यांच्या आत्महत्येचं नेमकं कारण समजलं नसून पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला आहे.

### दारूच्या नशेत त्याला काहीच नाही ...

अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक या कलमांचा सुध्दा सामावेश करुन आरोपी गुरव याला पोलिस कोठडीत दाबले आहे. वांगणी जवळ असलेल्या डोणे गांवात विश्वनाथ अपार्टमेंट मध्ये राहणारे चंद्रकांत यांची २४ वर्षीय मुलगी ही त्यांच्या संकुलातील सी विंगमध्ये गेल्या आठवड्यात विजेचे बिल घेण्यासाठी गेली होती. तेव्हा त्याच संकुलात राहणाऱ्या प्रमिला गुरव यांचा पवार यांच्या मुली सोबत वाद झाला होता. त्याच वादाचा राग मनात धरुन प्रमिला गुरव यांचा मुलगा निखिल गुरव (२५) हा दारुच्या नशेत १० सप्टेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास चंद्रकांत पवार यांच्या घरी गेला. व त्यांची पत्नी व मुलाला मारहाण करु लागला. तेव्हा त्यांना वाचविण्या करिता पवार हे मध्ये पडले असता अगोदरच गुरव याने सोबत आणलेले पेट्रोल पवार यांच्या अंगावर ओतुन त्याना पेटवुन दिले. त्या आगीत पवार हे गंभिररित्या भाजले असल्याने त्याना प्रथम वांगणी येथील आरोग्य केंद्रात उपचारा करिता नेले. मात्र तेथे व्यवस्थित उपचार होत नसल्याने त्याना उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात नेले. परंतु तेथे ही त्यांची प्रकृती खालावत गेल्याने त्याना मुंबई येथे हलविण्यात आले. पण त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर झाल्याने बुधवारी त्यांचा मृत्यू झाला आहे. तेव्हा बदलापुर ग्रामीण पोलिसांनी चंद्रकांत पवार यांना जिवंत जाळल्या प्रकरणी निखिल गुरव याला अटक केली आहे. तर न्यायालयाने त्याला चार दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

### शेत मालकाचा राग खूपच अनावर ...

कापून नेले तरी ही भांडणे ही होत असतात. कुरूकली गावातील किरण आणि किशोर याची मळीची शेती नदीकाठावर असल्याने वैरणीसाठी ते दोघे दररोज आपआपल्या गाडीवरून म्हैशीसाठी वैरण आणीत होते. गेल्या दहा पंधरा दिवसा पूर्वी किशोर उर्फ काशीनाथ पाटील याच्या मालकीची म्हैस किरण पाटील याच्या मळीच्या शेतात चरण्यासाठी गेली होती. त्याची म्हैस ही चुकून त्याच्या शेतात चरण्यासाठी गेली असली तरी किशोर ऊर्फ काशीनाथ पाटील व किरण पाटील यांचेत त्यावेळी बराच मोठा वाद होऊन भांडण झाले होते. त्यावेळी किरण हा तुघी म्हैस ही माझ्या मळीत कशी आली. आणि तू सारखे माझ्या हक्काच्या असणाऱ्या मळीतील गवत का कापतोस असे विचारले होते. गावातील शेतकरी भोगावती नदीकाठावरील या वैरणीला हतीचा गवत असे म्हणत होते. ही वैरण हिरवी गार आणि हतीसारखी उगवून येत असल्याने जनावरांना ती चांगली आहे. त्यामुळे तेथे गवत कापणाऱ्यावरून गावातील शेतकऱ्यात बराच वेळा वाद होत होता. असाच वाद त्या दोघात झाला होता. दोघे ही एकमेकाला शिवीगाळ करीत एकमेकांच्या अंगावर जात एकमेकांना मारहाण करीत होते.त्यावेळी किरण याने किशोर याला बघून घेण्याची भाषा केली होती. त्या दोघांची भांडणे दोघांच्या कुटूंबातील लोकांनी आणि गावातील पंचानी मिटिवलेली होती.या प्रकरणावर त्यावेळी तात्पुरता पडदा पडलेला होता. दोघे ही तरूण दोघांच्या ही अंगात सळसळते रक्त असल्याने खून्नशीपणा दोघात राहिलेला होता. त्या भांडणाची सल दोघांच्या ही मनात होतीच. म्हणून तरीही त्या दोघात गेल्या पंधरा दिवसापासून अधून मधून वाद विवाद हा होत होता. किरण हा त्या वादातून किशोर याला धमकी देत होता. म्हणून किशोर याने याबाबतीच तक्रार जवळच्याच इस्पुर्ली पोलीस स्टेशनला दिली होती. आपल्या तक्रारीत त्याने किरणपासून आपल्या जीवितास धोका असल्याचे म्हटले होते. चुकून म्हैस शेतात गवत चरण्यासाठी गेली तर एवढयाशा घटनेचा त्यावेळी त्याने एवढा मोठा बाऊ केला होता.त्याच्या तक्रारची दखल घेत त्यावेळी किरणला पोलीसांनी बोलावून घेऊन समज दिलेली होती. याचा राग किरणला आलेला होता.तो किशोरवर जास्तच चिडून होता.त्याला किशोर याला कायमचा धडा शिकवायचा होता. म्हणून तो त्याचेवर डुख धरून होता. गावात अगर कुठेही ते दोघे समोर समोर भेटले की एकमेकांकडे बघुन खून्नसीपणाने बघत होते. गेल्या तीन वर्षापूर्वी किशोर याचे लग्न झाले होते.त्याला एक वर्षाचा मुलगा ही होता.त्याच्यावर संसाराची जबाबदारी वाढल्याने तोच आता म्हैशीची वैरण पाणी बघत होता. आपल्या म्हैशीसाठी तो नदीकाठावरील हती गवत कापून आणीत होता. आता ते दोघे ही एकमेकांच्या शेतातील गवत कापत होते. त्यातून ही वाद वाढत चालला होता. किशोर याचे आजोळ राधानगरी जवळील कौलव येथे आहे. त्याच्या आजोबाचे नुकतेच निधन झाल्याने किशोर याच्या घरातील त्याचे आई वडिल आणि त्याची बायको हे कौलव येथे गेले होते. त्यामुळे गुरूवार दि.१० सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११ वाजणेच्या सुमारास किशोर हा आपल्या दुचाकीवरून कॉलेजच्या रस्त्यावरून खडीचा माळ या आपल्या शेताकडून नेहमीप्रमाणे येत होता. हा रस्ता कोल्हापूर राधानगरी राज्य महामार्गापासून जवलच ५० मीटर अंतरावर आहे. त्यामुळे या रस्त्यावरून लोकांची वर्दळ ही सारखीच असते. त्यातच त्याचवेळी किरण हा किशोर याच्या आडवा आला होता. त्याच्या हातात कोयता होता.त्याने किशोर याला अडवून त्याची गाडी खाली पाडले आणि बघुन घेतो असे म्हणत कुणाला काही कळायच्या आतच त्याने त्याच्या मानेवर इतक्या क्रुरपणे कोयत्याने वार केले की, तो जागीच रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला होता.त्याच्या मानेतून रक्ताच्या धारा लागलेल्या होत्या. त्याने कोयत्याने केलेल्या वर्मी घावात त्याची मान जवळपास धडावेगळीच केली होती. आजूबाजुच्या लोकांना ही हे काय घडले याची कल्पना आलेली नव्हती. लोक बघता बघता घटनास्थळाकडे धावत आले होते.किरणच्या हातात रक्ताळलेला कोयता असल्याने बघ्यापैकी कुणी ही पुढे येण्याचे धाडस करीत नव्हते. याचाच फायदा घेत आणि रक्ताळलेला कोयता हातात घेऊन किरण हा गावातील चौकात येऊन आपण किशोर आणि त्याच्या चुलत्याचा ही खून केल्याचे ओरडून सांगत होता.त्याला पकडण्याचे धाडस कुणीच करत नव्हते.बघता बघता या खूनाची बातमी कुरूकलीसह शेजाऱ्याच्या गावात ही पोहचली होती.घटनास्थली गावातील लोकांनी गर्दी केली होती.रस्त्याच्या कडेला मयत किशोर याची दुचाकी पडली होती.तर बाजुलाच त्याचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता.एखाद्या हिंदी सिनेमाच्या घटनेला ही लाजवेल अशी थरारक घटना घटना घडली होती.या घटनेनंतर किरण हा रक्ताळलेला कोयता घेऊनच इस्पुर्ली पोलीस ठाण्यात स्वत:हून हजर झाला होता.त्याच्या हातातील रक्ताने माखलेला कोयता बघून पोलीस ही आवाक झाले होते.त्यांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. त्याने आपण किशोर ऊर्फ काशीनाथ पाटील याचा खून केल्याचे पोलीसांना सांगितले. या घटनेची माहिती इस्पुर्ली पोलीसांनी करवीर पोलीसाना दिली. कारण इस्पुर्ली पोलीस ठाणे हे करवीर पोलीस ठाण्याचे अंकीत येत होते. करवीर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळेकर हे आपल्या सहकार्यास घटनास्थळी दाखल झाले होते.या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपाधीक्षक प्रशांत अमृतकर यांनी ही घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली होती.पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मयत किशोर याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला होता.संशयीत आरोपी किरण पाटील हा स्वता:हून पोलीस ठाण्यात हजर झाल्याने ही घटना नेमकी कोणत्या कारणातून घडली आहे याची कल्पना पोलीसाना आलेली होती. पोलीसांनी किरण पाटील याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता,त्याने कोणतेही आढेवेढे न घेता आपला गुन्हा कबुल केला होता. मयत किशोर याच्या भावाने या घटनेची फिर्याद करवीर पोलीस ठाण्यात दिली होती. त्याच्या तक्रारीवरून पोलीसांनी किशोर साताप्पा पाटील (वय ३०) याच्या खून प्रकरणी किरण हिंदुराव पाटील (वय ३२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला कोल्हापूर येथील कोर्यात उभे केले असता.मा.न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला होता.या घटनेनंतर मयत किशोर याच्या नातेवाईकांनी या घटनेबाबत पोलीस उपाधिक्षक प्रशांत अमृतकर याना धारेवर धरून मागे आठ दिवसापूर्वी किशोर याने आपल्या जीवीतास किरण पाटील याच्याकडून धोका असल्याची तक्रार पोलीस ठाण्याला दिली असताना ही या तक्रारीची गंभीरतेने दखल न घेता केवळ किरण याला समज देऊन सोडून देण्यात आल्याने ही खूनाची घटना घडल्याचे सांगत त्यांना धारेवर धरले होते. यावेळी पोलीस उपाधिक्षक यांनी याबाबत चौकशी करून संशयीत आरोपीची गय केली जाणार नसल्याचे मयताच्या नातेवाईकांना सांगितले. या घटनेचा पुढील तपास करवीर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळेकर हे करीत आहेत. केवळ नदीकाठावरील गवत कापल्याच्या वादातून किरण याने किशोर याचा कोयत्याने खून केल्याची घटना घडल्याने आजची तरूण पिढी ही कोणत्या दिशेने जात आहे.राग आणि भीक माग अशीच त्यांची गत होते.मुळात भांडणाला आणि त्यातून खूनासारख्या घटनेला कोणतेही क्षुल्लक कारण पुरेसे ठरत असल्याचेच या घटनेतून दिसून येते.

### लग्न ठरताच त्याच्या डोक्याचा ताप ...

परंतु गेल्या दोन दिवसांपासून ते घरी परतलेच नाहीत. त्यांच्या घरच्यांनी सर्वत्र शोध घेतल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांनी २८ ऑगस्ट रोजी नागपाडा पोलीस ठाण्यात ते हरवल्याची तक्रार दिली. मुंबई महानगरपालिकेत चांगल्या पदावर काम करणारा हा अधिकारी अचानक बेपत्ता झाल्याने नागपाडा पोलीसांनी या तक्रारींची गंभीर दखल घेतली. नागपाडा पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम, पोलीस निरीक्षक दुष्यंत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदेश मांजरेकर, पोलीस उपनिरीक्षक एकनाथ देसाई, बी.डी.जाधव, अनिल शिंदे या पथकाने तपास सुरू केला. पोलीसांनी याबाबत चौकशी सुरू केली. त्याचा मोबाईल तसेच त्यांच्या कार्यालयात, घरी त्यांचे मित्र, नातेवाईक हे सर्वची पोलीसांनी चौकशी केली. जे थोडेफार संशयित वाटले त्यांचे जाबजबाब घेतले. त्यांच्या बॅकेच्या व्यवहारावरही पोलीसांनी लक्ष ठेवले असता त्यातूनही काही व्यवहार होत नसल्याचे लक्षात आले. तरी तपासाला काही गती काही मिळत नव्हती. हरवलेल्या व्यक्तीबद्दल पोलीसांना तूसभर हि माहिती मिळाली नाही. पैशासाठी कुणी त्यांचे अपहरण केले असेल असा विचार केला तरी तसा त्याच्या कुटुंबियांना कुणाचा फोन ही आलेला नाही. मग हे अचानक बेपत्ता कसे झाले याचाच विचार तपास यंत्रणा करीत होती. या तपासात जाणकार पोलीस अधिकारी लक्ष घालून होते. आता तपास पथकाने त्यांच्या कुटुंबियांवर लक्ष ठेवले. पत्नी बरोबर त्यांची कुरबुर होत होती. पत्नी व त्यांच्यात शुल्लक कारणावरून वाद होत होता अशी माहिती पोलीसांना मिळाली होती. त्या अनुषंगाने पोलीसांनी चौकशी केली. परंतु त्यातूनही काही निष्पन्न झाले नाही. पोलीस सर्व बाजू तपासून पाहत होते. तरीही अशोक राऊत यांच्या बेपत्ता होण्यामागेचे गृढ अजूनही गुलदस्त्यातच होते. मग पोलीसांनी अधिक खोलवर जाऊन तपास करण्यास सुरुवात केली. त्यांच्या मोबाईल कॉल रेकॉर्ड काढून ते पोलीसांनी बारकाईने तपासले असता ते हरवण्यापूर्वी संपर्कात असलेल्या व्यक्तीचे नंबर पोलीसांना मिळाले. या नंबरवरून पोलीसांनी एलफिन्स्टन परिसरात राहणा-या दोन तरूणांना ताब्यात घेतले. हे तरून हरवलेल्या व्यक्तीच्या सतत संपर्कात होते. हेच संशयित हरवलेल्या व्यक्तीचा क्ल्यू देऊ शकतात याची खात्री पोलीसांना होती. कोण राऊत आम्ही कुणाला ओळखत नाही. साहेब आम्ही आमचे घर भले आणि आमचे काम भले या व्यतिरिक्त आम्ही कुठे जात-येत नाही. असं सांगत त्यांनी सुरवातीला उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. परंतु पोलीसांचा संशय अधिकच बळावल्यानंतर पोलीसांनी त्यांच्या चौकशीची पद्धत बदलत त्यांना पोलीसी खाक्या दाखवला. तसे ते सुतासारखे सरळ होत त्यांनी थेट राऊतच्या हत्येची कबुली दिली. संशयित आरोपींनी हत्येची कबुली दिली असली तरी त्यांनी राऊतची हत्या का केली हा यक्ष प्रश्न होताच. पोलीसांनी अधिकच चौकशीचा फास आवळताच मयतचे एका तरूणाबरोबर समलैगिक संबध असल्याचे समोर आले.जेंव्हा त्यांच्यात वितष्ट आले तेंव्हा एका मित्राच्या मदतीने राऊत यांचा काटा काढल्याचे संशयितांच्या चौकशीतून समजले. समाजमाध्यमांवरून या दोघांची ओळख झाली होती. दोघे एकमेकांना भेटत होते. त्यांची घट्ट मैत्री झाली होती. त्यातून त्याचे समलैगिक संबध सुरू झाले होते. मात्र आता घरचे लोक लग्न जुळवण्याचा विचार करीत असल्याने हे संबध कायम ठेवण्यास आरोपी तरूणाने नकार दिला. तरीही हि व्यक्ती त्याचा पिच्छा सोडत नव्हती. त्याच्या याच त्रासाला कंटाळून या तरूणाने आपल्या मित्राच्या मदतीने राऊत यांचा काटा काढला. दारूची पार्टी आहे असे सांगून दोघेजण राऊतला भिवंडीला घेऊन गेले. तेथे एथेच्छ दारूची पार्टी देण्यात आली. राऊत ही मनमुरादपणे दारू प्यायला. आता राऊतची शुद्ध हरपली होती. हिच संधी साधून त्याची हत्या करण्यात आली. जंगलात दोन दिवस आधी खणून ठेवलेल्या खड्यात त्याला पुरून टाकले. आरोपीच्या कबुली जबाबानंतर पोलीसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना १९ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### शुल्लक वाद प्राणावर बेतला...

या थप्पडची गुंज अल्तमश यास ऐकावीच लागेल असे शाहरुख याने मनाशी म्हटले होते. आता काहीही करुन अल्तमश यास कायमचा धडा शिकवायचा असे शाहरुख याने नक्की केले होते. दोघातील वाद व हाणामारी झाल्यानंतर दोघे तेथून निघून गेले. मात्र शाहरुख याने अल्तमश यास बघून घेण्याची भाषा केली होती. आपल्या कानशिलात लगावणारा अल्तमश हा रात्रीच्या वेळी भुसावळ शहरातील खडका चौफुली जवळ उभा असल्याचे शाहरुख यास समजले. त्यामुळे त्याचा वचपा काढण्यासाठी त्याने त्याचे साथीदार शेख समीर शेख युसूफ, समीर शेख रहेमान शेख, अमीर युसूफ शेख व आदर्श गायकवाड या चौघांना बोलावून घेतले. शाहरुख सह सर्व पाच जणांनी रात्रीच्या वेळी अल्तमश याच्यावर हल्ला चढवला. सर्वांनी मिळून अल्तमश यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. यातील समीर हा त्याच्याजवळ कायम चाकू बाळगत असे. त्याने त्याच्या ताब्यातील चाकूने अल्तमश याच्या छातीवर, पोटावर व पाठीवर चाकूने सपासप वार करण्यास सुरुवात केली. आपल्यावर होणाऱ्या जिवघेण्या हल्लयामुळे जखमी अल्तमश जिवाच्या आकांताने ओरडू लागला. या हल्ल्याचे दृश्य समजताच परिसरातील दुकानदारांनी आपली दुकाने पटापट बंद केली व त्यांनी भितीपोटी तेथून पळ काढला. त्यावेळी जखमी अल्तमश यास खडका रस्त्यावरील उड्डाणपुलाच्या खाली टाकून पळ काढला. यावेळी जखमी अल्तमश याचा आतेभाऊ जावेद हा तेथे टपरीवर चहा पिण्यासाठी आलेला होता. त्याने हा प्रकार बघताच मारेकरी पळून गेल्यानंतर घटनास्थळ गाठले. जावेद याने त्याचा मामा शेख रशीद शेख मासुम यांना फोन करुन या घटनेची माहिती दिली. आपल्या मुलावर प्राणघातक हल्ला झाल्याचे त्यांचे मन हेलावले. जावेद याने त्याचा मित्र शेख सिद्दीक याच्या मदतीने जखमी अल्तमश यास नजीकच्या डॉ. मानवतकर यांच्या दवाखान्यात नेण्याची व्यवस्था केली. जखमी अल्तमश याने आपले प्राण सोडले होते. त्यास डॉ. मानवतकर यांनी मयत घोषीत केले. दरम्यान मयत अल्तमश याचे वडील शेख रशीद शेख मासूम यांनी डॉ. मानवतकर यांचा दवाखाना गाठला होता. या घटनेची माहिती मिळताच डीवायएसपी गजानन राठोड व बाजारपेठ पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरिक्षक बाबासाहेब ठोंबे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळ व डॉ. मानवतकर यांचा दवाखान्याला भेट देत माहिती जाणून घेतली. या घटनेप्रकरणी मयत अल्तमश याचे वडील शेख रशीद शेख मासुम यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भुसावळ बाजारपेठ पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर भुसावळ बाजारपेठ पोलिसांच्या डीबी पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे फिरवण्यास सुरुवात केली. रात्रीच तिघा संशयीत मारेकऱ्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर एका पाठोपाठ एक अशा दोघांना देखील अटक करण्यात पोलिस पथकाला यश आले. मारेकऱ्यांनी मयत अल्तमश याच्या पोटावर, छातीवर जवळपास अकरा वार केले होते. मारेकऱ्यांना न्यायालयाने सुरुवातीला पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले असता न्या. मानकर यांनी त्यांना न्यायालयीन कोठडीत रवानगीचे आदेश देण्यात आले. समीर शेख, शाहरुख शेख, आमीर शेख, रमजान शेख व आदर्श गायकवाड असे सर्व मारेकरी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. डीवायएसपी गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास पो.नि. दिलीप भागवत व त्यांचे सहकारी मंगेश गोटला करत आहेत. त्यांना पोलिस नाईक किशोर महाजन, रविंद्र बि-हाडे, श्रीकृष्ण देशमुख, उमाकांत पाटील, पोलिस कर्मचारी इश्वर भालेराव, प्रशांत परदेशी, रमन सुरळकर, समाधान पाटील, विकास सातदिवे, योगेश महाजन यांचे सहकार्य लाभले.

# दिवसाढवळ्या स्कॉर्पिओतून शेळ्यांची चोरी करणाऱ्यांना कामती पोलिसांनी केले जेरबंद





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील कामती पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या अरबळी, मोहोळ येथे दिवसाढवळ्या शेळ्यांची चोरी करून चार चाकी वाहनाने पोबारा करणाऱ्या चोरट्यांना कामती पोलिसांनी एक तासात जेरबंद केले आहे.

पोलिसांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार पांडुरंग बबन राऊत (वय २४ रा. अरबळी ता.मोहोळ जि. सोलापूर) यांच्या राहत्या घरासमोरील तीन शेळ्यांची दोरखंड कापून कोणीतरी पाच लोक त्या शेळ्या चारचाकी महिंद्रा स्कॉर्पिओ या गाडीतून भरून नेत असताना गुरुवारी १७ रोजी दुपारी १:३० वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आले. राऊत यांनी त्या लोकांना अडविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान या इसमांनी त्यांच्या हातातील तलवारीचा धाक दाखवून तिथून निघून गेले. त्या चारचाकी वाहनाचा नंबर पाहून त्यांनी कामती पोलीस ठाणे गाठले. वाहन क्रमांक एमएच ४५ ए ७६२२ या वाहनातून पाच चोरट्यांनी माझ्या घरासमोरील तीन शेळ्या चोरून पळाले असल्याची फिर्याद कामती पोलीस ठाण्यात दिली. लागलीच कामती पोलीस ठाण्याचे सपोनि किरण उंदरे यांनी सोशल मीडियाचा वापर करत वाहनांची माहिती मागविण्यास सुरवात केली. या चारचाकी वाहनांसाठी कुरुल, कामती, कोरवली, बेगमपूर व सोहाळे या गावात पोलिसांनी सापळा लावला होता. एका गुप्त महितीदारकडून अशा नंबरची गाडी सोहाळे मार्गे येत असल्याची बातमी कळताच सपोनि किरण उंदरे पोलीस कॉन्स्टेबल सुनील पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल अमोल नायकोडे व होमगार्ड हे सोहाळे चौकात आले.

स्कार्पिओ वाहन चालकांनी सोहाळे चौकातील पोलीस गाडी पाहताच गाडी सोडून पळून गेला तर इतर चारजण, वाहन व शेळ्या पोलिसांनी ताब्यात घेतल्या. ताब्यात घेतलेल्या संशयीत आरोपीची नावे भोला उर्फ छोटा लाल्या काशीनाथ गायकवाड (३०), विनायक उर्फ विनोद सिद्राम जाधव (२८), मारुती विलास जाधव (२८), भारत चंद्रकांत गायकवाड (३९) सर्व जण रा.सेटलमेंट फ्री कॉलनी न.३ सलगर वस्ती सोलापूर अशी अटक केलेल्या संशयित आरोपीची नावे आहेत. यांच्याकडून एकूण एक चारचाकी वाहन व तीन शेळ्या असा पाच लाख पंधरा हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्ह्यातील चोरटे पकडण्यासाठी पोकॉ सुनील पवार, पोना मेहबूब शेख, राहुल दोरकर, पोहेकॉ अमोल नायकोडे, पोना बबलू नाईकवाडी, पोहेकॉ यशवंत कोटमाळे, पोहेकॉ बापू दुधे, पोकॉ मसलखांब आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी मदत केली. भादंवि नुसार ३९५, ३९७ प्रमाणे कामती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास कामती पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण उंदरे करीत आहे.

## सामाजिक उपद्रव माजवणाऱ्या मद्यपी कर्मचाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी

**भिवंडी/अभिजित हिरे**

शासकीय तसेच निमशासकीय सेवेत कर्तव्य बजावत असतांना दारू पिणे हा गंभीर गुन्हा आहे. मात्र असे असताना भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागातील आमणे गावात असलेल्या शेतकरी उन्नती मंडळ काल्हेरच्या न्यू- इंग्लिश स्कुल आमणे शाळेत शिपाई पदावर कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्याने परिसरात दारू पिऊन हैदोस माजविला आहे. विशेष म्हणजे स्थानिक पडघा पोलीस ठाण्यात या मद्यपी शिपायाविरोधात स्थानिक महिलांनी वारंवार तक्रारी दाखल करूनही पडघा पोलीस या मद्यपी शिपायावर कारवाई करत नसल्याने महिला वर्गाकडून पोलीस प्रशासनाबाबत नाराजीचा सूर उमटला आहे. शाळेच्या संस्थाचालकांनी तसेच पोलीस प्रशासनाने या मद्यपी शिपायावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे. न्यू- इंग्लिश स्कुल आमणे या शाळेत सुभाष हरी जाधव हा इसम शिपाई पदावर कार्यरत असून सदर इसम नेहमीच दारूच्या नशेत असल्याने सदर इसम शाळेतील शिक्षक, शिक्षिका तसेच विद्यार्थ्यांबरोबर व परिसरातील महिला व नागरीकांशी विनाकारण वाद घालत असल्याच्या तक्रारी आमणे गावातील स्थानिक नागरिकांसह महिलांनी वेळोवेळी पडघा पोलीस ठाणे तसेच शाळा प्रशासनांकडे केल्या आहेत. मात्र पडघा पोलीस केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल करून घेत असल्याने या इसमाचा उपद्र्याप जास्तच वाढला आहे. या मद्यपी इसमावर शाळा प्रशासनाने निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी आमणे येथील स्थानिक नागरिक व महिलांसह ॲड.संदीप जाधव यांनी जि.प.माध्यमिक शिक्षण विभागाकडे केली आहे. शिक्षण संस्थेकडे सुभाष जाधव यांच्याविषयी तक्रारी आल्या आहेत विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडून देखील त्यांच्या चौकशीचे पत्र संस्थेला प्राप्त झाले असून सदर शिपाई पदावर कार्यरत असलेल्या सुभाष जाधव यांची खातेनिहाय चौकशी करून अहवाल संबंधित विभागाला पाठविण्यात येईल अशी प्रतिक्रिया न्यू इंग्लिश स्कुल आमणे व शेतकरी उन्नती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राजू अनंत पाटील यांनी दिली आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### परिवर्तवादी विचाराचे संघर्षशील नेतृत्व हरपले

लातूर : ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.विठ्ठल मोरे यांचे निधन झाल्याचे वृत्त अत्यंत दुःखदायक आहे. त्यांच्या निधनामुळे परिवर्तवादी विचाराचे संघर्षशील नेतत्व हरपले आहे, अशा शब्दात वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिककार्य मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री लातूर अमित विलासराव देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पालकमंत्री देशमुख यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, डॉ.विठ्ठल मोरे मार्कसवादी कम्युनिष्ठ पक्षाच्या विचाराशी एकनिष्ठ होते. शिक्षण क्षेत्रातील प्रश्र्ना बरोबरच कष्टकरी समाज तसेच मराठवाडयाचा विकासाच्या प्रश्र्नावर त्यांनी सातत्यांने संघर्ष केला. सामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे ही त्यांची भुमिका होती. त्यांच्या जाण्यामूळे पुरोगामी विचाराच्या चळवळीमध्ये निश्चितच एक पोकळी निर्माण होणार आहे. त्यांच्या कुटुंबियाचेही अपरिमीत नुकसान झाले आहे. मोरे कुटुंबियाला या दु:खातुन सावरण्याची शक्ती मिळावी अशी मी इश्वराकडे प्रार्थना करून डॉ.विठठल मोरे यांना श्रध्दाजली अर्पन करीत असल्याचे पालकमंत्री देशमुख यांनी शोकसंदेशाच्या शेवटी म्हटले आहे.

### पीपीएफचे नवीन खाते उघडण्यासाठी मोहिम

लातूर : लातूर आणि उस्मानाबाद जिल्हयातील नागरिकांनी दिनांक १६ सप्टेंबर २०२० ते ३० सप्टेंबर २०२० पर्यंत सुकन्या समृध्दी योजना व पीपीएफ चे नवीन खाते उघडयाची विशेष मोहिम लातूर आणि उस्मानाबाद जिल्हयातील पोस्ट ऑफिस मध्ये सुरु करण्यात आली आहे. या दोन्ही जिल्हयातील नागरिकांनी आपल्या मुलींच्या शिक्षण, लग्न व उज्वल भविष्यासाठी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन डाक अधिक्षक बी. रवि कुमार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जवळच्या पोस्ट ऑफिसला संपर्क साधावा असे अधिक्षक, पोस्ट ऑफिस उस्मानाबाद विभाग, लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### सिलेंडरने लागलेल्या आगीत हॉटेल जळाले

भिवंडी : तालुक्यातील वळ ग्रामपंचायत हद्दीत रस्त्यालगत असलेल्या हॉटेलमध्ये गॅस सिलेंडर लिकेज झाल्याने सिलेंडरने अचानक पेट घेतल्याने संपुर्ण हॉटेल जळून खाक झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास घडली आहे. या दुर्घटनेत हॉटेल जळून खाक झाले आहे. ज्योती हॉटेल असे नाव असलेल्या हॉटेलमध्ये सकाळी नऊ वाजता हॉटेल चालक सिलेंडर बदली करीत असताना सिलेंडर लिकेज असल्याने त्याने अचानक पेट घेतल्याने हॉटेलमधील बाकडे व पोटमाळा व फर्निचर असे सर्व साहित्य जाळून खाक झाले आहे.स्थानिकांनी प्रसंगावधान राखीत गॅस सिलेंडर बाहेर काढल्याने मोठी जीवित व वित्तहानी टळली असून भिवंडी अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणली आहे.

### लाभधारकांना कार्यादेशांचे वितरण

लातूर : लातूर शहर महानगर पालिकेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजनेची अमलबजावणी केली जात असून मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश वितरित करण्यात आले.यावेळी राज्यमंत्री संजय बनसोडे, जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे,महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, आयुक्त देविदास टेकाळे उपायुक्त शशीमोहन नंदा यांची उपस्थिती होती. या महात्वाकांक्षी योजनेअंतर्गत महानगर पालिकेच्या वतीने आजपर्यंत ४०५६ घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. या अंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला २ लाख ५० हजार रुपये निधी दिला जाणार आहे. पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात महम्मद रफी युनूस सय्यद, रुक्मिणबाई शंकर हुलगुंडे,जिजाबाई शिवाजी आडगळे यांना कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले. आज एकूण २७३ लाभार्थ्यांना बांधकाम परवाना व कार्यारंभ आदेश देण्यात आला.

### भिवंडीत भारतमाता प्रतिमेचे अनावरण

भिवंडी : भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पंचायत समिती भिवंडीच्या उपसभापती दालनात भारतमातेच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. उपसभापती दालनात भारतमाता प्रतिमा लावण्याचा उद्देश म्हणजेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतमातेला सर्वस्वी मानून देश सेवेचे काम करीत आहेत, तर त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रतिमेचे अनावरण करण्यात आले आहे असे उपसभापती जितेंद्र डाकी यांनी सांगितले आहे. भारतमाता प्रतिमेच्या अनावरण सोहळ्यादरम्यान पंचायत समिती कार्यालयातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त ७० कर्मचारी व अधिकाऱ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचायत समिती उपसभापती जितेंद्र डाकी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष निलेश गुरव, भाजप गटनेते भानुदास पाटील, बीडीओ डॉ.प्रदीप घोरपडे, बांधकाम विभागाचे उपअभियंता दत्तू गीते, सहाय्यक गटविकास अधिकारी अविनाश मोहिते, पंचायत समिती सदस्य महेंद्र पाटील, विनोद मुकादम, गुरुनाथ जाधव, गजानन आसवारे, विकास धिंडा, यशवंत भोईर, पंडित नाईक, गंगाराम उगले आदी मान्यवर उपस्थित होते.

### उमाकांत दत्तोबा मुंडे यांचे निधन

उस्मानाबाद : कळंब तालुक्यातील गोविंदपूर या गावचे शिल्पकार माजी सरपंच उमाकांत दत्तोबा मुंडे पाटील यांचे गुरूवारी अल्पशा आजाराने पुण्यातील जहांगीर हॉस्पिटलमध्ये निधन झाले. ते ६१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, चार मुले, भाऊ व नातवंडे असा परिवार आहे. पुणे येथील माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे ते लाडके व ज्येष्ठ भाच्चे होते. सामाजिक, राजकीय व शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे उमाकांत मुंडे हे पद्मसिंह पाटील व राणा जगजितसिंग पाटील यांचे निकटवर्ती होते.त्यांनी आपल्या जीवनात मजूर फेडरेशन उस्मानाबादचे अध्यक्षपद व विद्यमान संचालक म्हणून कार्यकरत होते. गोविंदपूर येथील सरस्वती हायस्कुलचे संस्थापक अध्यक्ष, उस्मानाबाद जिल्हा परिषदचे सदस्य पद भूषविले होते. त्याच प्रमाणे या क्षेत्रात प्रगतशील शेतकरी म्हणून त्यांना ओळखले जात होते. उमाकांत मुंडे यांनी गावातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य केलेले आहे. त्यांनी अनेक बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे कार्य केले आहे. गोविंदपूरचा कायापालट करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. समाजातील तळागळातील लोकांच्या मदतीसाठी ते सदैव तत्पर असत. सध्या गावांचे सरपंच पद त्यांच्या पत्नीकडे आहे.

## मोहोळ पोलीस ठाण्यातील दोन अधिकारी आणि एक पोलिस कर्मचारी निलंबीत

**सोलापूर/प्रतिनिधी**

तक्रारदाराच्या तक्रारीनंतर संशयित आरोपीविरुध्द मोहोळ पोलिस ठाण्यात एन.सी. दाखल करण्यात आली. त्यानंतर संबंधित संशयित आरोपीला अटक करुन जेलमध्ये टाकले. त्याला जाणिवपूर्वक त्रास दिल्याचा ठपका ठेवत मोहोळ पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सागर ढाकणे, सहायक पोलिस निरीक्षक सलीम शेख आणि पोलिस नाईक सुहास पवार या तिघांना निलंबीत केल्याचे पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांनी 'पत्रकारां'शी बोलताना सांगितले.

> **वरिष्ठाची परवानगी न घेता किरकोळ गुन्ह्यातील संशयित आरोपीला लॉकअपमध्ये टाकणे, त्याला जाणिवपूर्व त्रास देणे अपेक्षित नाही. डी.वाय.एस.पी. प्रभाकर शिंदे यांच्या अहवालानुसार मोहोळ पोलिस ठाण्यातील दोन अधिकारी व एका पोलिस कर्मचाऱ्यास निलंबीत केले आहे.**
>
> **– मनोज पाटील, पोलिस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण**

मोहोळ तालुक्यातील आष्टी (शेटफळ) येथील ग्रामपंचायतीच्या जागेत अनिकेत पाटील यांनी मुरुम टाकला होता. त्यानंतर तक्रारदाराने ती जागा माझी आहे म्हणून तिथे दुकान थाटले. परंतु, अनिकेत पाटील यांनी ते दुकान मोडून टाकले. त्यानंतर तक्रारदाराने मोहोळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पाटीलविरुध्द गुन्हा दाखल झाला. त्यानंतर तुझ्याविरुध्द दरोड्याचा गुन्हा दाखल होईल. त्यामुळे २५ हजार रुपये देऊन भांडण मिटवून घे, असे संबंधित पोलिसांनी अनिकेत पाटील यास सांगितल्याची चर्चा आहे. दरम्यान, पाटील यास वरिष्ठाच्या परवानगीशिवाय जेलमध्ये टाकून जाणिवपूर्वक त्रास दिला. तशी तक्रार अनिकेत पाटील यांनी पोलिस अधीक्षकांकडे केली. पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांनी त्याअनुषंगाने तपास करण्याचे आदेश डी.वाय.एस.पी. प्रभाकर शिंदे यांनी दिले. त्यानंतर तत्काळ चौकशी करुन शिंदे यांनी पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांच्याकडे चौकशी अहवाल सादर केला. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

**प्रभारी पोलिस निरीक्षकही रजेवर**

मोहोळ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे हे रजेवर गेले असून त्यांच्याकडील पदभार आशितोष चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मात्र, आता तेही रजेवर गेल्याची माहिती पोलिस ठाण्याकडून देण्यात आली. दरम्यान, मोहोळ पोलिस ठाण्यातील दोन अधिकारी व एक पोलिस कर्मचारी निलंबित केला आहे. त्यामुळे आता ठाण्यात पोलिस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची संख्या खूपच कमी झाली आहे.

## पोलीस कर्मचारी संघपाल तायडे यांची गायनाकडून अभिनयाकडे वाटचाल



**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा पोलीस दलातील सुरेल आवाजाचे गायक संघपाल तायडे यांच्या तुला कॉलेजमा भेटायला येसू या पहिल्याच अहिराणी गाण्याचे चित्रीकरण जळगाव शहरातील विविध निसर्गरम्य वातावरणात पूर्ण झाले आहे. या गाण्यात साउथ इंडियन ट्रॅकवर खानदेशी नृत्य कलावंत आपली कला दाखवतांना दिसणार आहेत. संघपाल तायडे यांची वर्दीतील दर्दी माणूस अशी ओळख त्यांच्या कलेतून टिकून आहे. त्यांनी आपले अभिनय व गायन कौशल्य आपल्या गीतांच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. त्यामुळेच ते लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचले आहे.

त्यांनी गायलेले अहिराणी गाणे गुलाब गायकवाड यांनी शब्दबद्ध केले असून दिग्दर्शक विशाल वानखेडे आहे. 'तुला कॉलेजमा भेटायला येसू', या गाण्याची रचना विठ्ठल गायकवाड व वैशाली गायकवाड यांची असून त्याला हेमंत पाटील यांची साथ लाभली आहे. या गीताच्या चित्रीकरणात संघपाल तायडे यांनी गायनासोबत अभिनय केला असून त्यांच्यासोबत सहकलाकार म्हणून त्यांची पत्नी भाग्यश्री तायडे यांची साथ लाभली आहे. कॅमेरामन चारुदत्त वाणी, बाळू वाघ, संतोष ढिवरे, नृत्य प्रशिक्षक सचिन भिरुड उर्फ रँचो, नृत्य कलाकार विष्णू माळी, लक्ष्मण गायकवाड, करण मोरे, सचिन चव्हाण, करण शिंपी, स्वप्नील इंगळे, समाधान सपकाळे, वरुणराज मैराळे, प्रभाकर बोदडे यांच्यासह अन्य कलाकारांनी परिश्रम घेतले आहे. दरम्यान संघपाल तायडे यांनी कोरोना काळात जनजागृती केली आहे. शेतकरी आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर त्यांनी 'दुष्काळ' हा लघुपट प्रसिद्ध केला आहे.

## भाजपचे मधुकर पाटील यांचे निधन



**वाडा** :तालुक्यातील खुपरी येथील रहिवासी, क्रियाशील समाजबांधव व भाजपचे जेष्ठ नेते मधुकर बाबुराव पाटील (८६) यांचे दुः खद निधन झाले आहे. १९७० ला ते राजकारणात आले त्यांनी त्यावेळी भारतीय जनता पक्षाच्या स्थापने पासून सक्रिय सद्यस्य म्हणून काम पाहिले. त्यानंतर १९८० ला त्यांनी भाजपात प्रवेश केला. एकत्रित ठाणे जिल्हा असताना जिल्ह्याच्या ग्रामीण भागात भाजपाचा प्रसार करण्याची पक्षाने त्यांच्यावर जबाबदारी सोपवली. ठाणे जिल्ह्याच्या गावागावात त्यांनी पक्ष बांधणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. भाजपच्या सर्व कार्यकर्ते त्यांना दादा या नावाने ओळखत होते, अखेरच्या श्वासापर्यंत भाजपाचे एकनिष्ठ कार्यकर्ता ते राहिले. एकत्रित ठाणे जिल्हा असताना त्यांनी भाजपा चे जिल्हा अध्यक्ष पद भूषविले होते. भूविकास बँकेचे त्यांनी संचालक पद भूषविले होते, खुपरी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन होते. ज्ञान प्रकाश शिक्षण संस्था वाडा संचालित चैतन्य विद्यालय गुंडे शहापूर आदर्श विद्यामंदिर कुडूस या संस्थेचे कार्याध्यक्ष होते.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर सेवा सप्ताहाचे आयोजन

## वाड्यात स्वच्छता अभियान राबविण्यात आला



**वाडा/प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने देशभर आयोजित केलेल्या सेवा सप्ताहाच्या अनुषंगाने वाडा तालुका बीजेपीच्या कार्यकर्त्यांनी वाडा तालुक्यातील प्रसिद्ध पांडवकालीन प्राचीन तीळसेश्वर मंदिराच्या परिसरातील दशक्रियाविधी घाटाची स्वच्छता करण्यात आली तसेच वाडा शहरातील समशानभूमीची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत भाजपचे जेष्ठ नेते बाबाजी कठोले, पालघर भाजपा जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील, पालघर भाजपा उपाध्यक्ष संदीप पवार, भाजपा वाडा तालुका अध्यक्ष मंगेश पाटील यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच वाडा तालुक्यतील भाजपा युवा कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. सेवा सप्ताहाच्या अनुषंगाने रक्तदान तसेच प्लाझ्मा दान, वृक्षारोपण असे विविध उपक्रम जिल्हाभर राबविले जाणार असल्याची माहिती भाजपचे पालघर जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी दिली.




**पालघर जिल्ह्यातील सातपाटील पोलीस ठाण्याच्या हद्दीत होणाऱ्या वाहन चोरीच्या घटनेला आळा घालण्यासाठी एक पथक तयार करून तपास सुरू केला. त्यात दोघांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांच्याकडून सातपाटी व विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे घडवून आणल्याची कबूली दिली. त्यांच्याकडून चार मोटार सायकल जप्त करण्यात आल्या.**

## आरोपीसह सोने विकत घेणाऱ्या ज्वेलर्सला ठोकल्या बेड्या

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील कामतघर परिसरात ७ ऑगष्ट रोजी रात्रीच्या सुमारास झालेल्या घरफोडीतील आरोपीसह त्याकडील चोरीचे सोने विकत घेणाऱ्या ज्वेलर्स दुकानदार व त्याचा कर्मचारी अशा तिघा जणांच्या मुसक्या आवळण्यात नारपोली पोलिसांना यश मिळाले आहे. कामतघर येथील शीतल राजेश पवार यांच्या घरी ७ ऑगष्ट रोजी रात्रीच्या दरम्यान घरफोडी करून अज्ञात चोरट्याने घरातील १०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम चोरी केली होती. या बाबत नारपोली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नारपोली पोलीस ठाण्याचे व पो. निरी. मालोजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक आर.जे. व्हरकटे, पो.हवा.सातपुते, पो.ना.सोनगीरे, पो.शि.जाधव, शिरसाठ,बंडगर या पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे भवानी नगर कामतघर परिसरात राहणार संशयित अनिकेत भिमाजी कदम वय २१ यास ताब्यात घेवुन कसून चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली देऊन चोरीचे सोने भिवंडी शहरातील सत्यम ज्वेलर्स या सोने विक्री दुकानाचे मालक बसंतीलाल नानालाल कोठारी व त्याचा नोकर देवीलाल रंगलाल नाई यांच्या कडे विकल्याची कबुली दिली. पोलीस पथकाने सदरच्या दुकानातून चोरीचे सर्व २ लाख ६२ हजार रुपयांचे दागिने जप्त करून या गुन्ह्यात तिघा जणांना अटक करण्यात यश मिळविले आहे.

# दुसऱ्या लॉकडाऊनची चाहूल!

अनलॉकच्या काळात राज्यातील उद्योग धंदे हळू हळू सुरू होऊन राज्याची आर्थिक गाडी रुळावर येत असतानाच या काळात मोठ्या संख्येने लोक घराबाहेर पडू लागल्याने कोरोनाचं आणखी फैलाव झाला. जी रुग्ण संख्या नियंत्रणात येत होती ती पुन्हा वाढली आणि मुंबईत जून, जुलै सारखी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे गुरुवारी मध्यरात्रीपासून मुंबईत पुन्हा एकदा संचारबंदी लागू करण्यात आली आहे. अर्थात त्याचा अनलॉकच्या प्रक्रियेवर काहीच परिणाम होणार नाही असे सरकारकडून कितीही सांगितले जात असले तरी ही संचारबंदी म्हणजे लॉकडाऊनची पूर्व तयारी आहे असे समजायला हरकत नाही. आणि तसे जर झाले तर राज्यात आणखी भयंकर स्थिती निर्माण होईल. कारण लॉकडाऊनचे भयानक दुष्परिणाम ज्या गोरगरिबांना भोगावे लागले आहेत त्यांच्यासाठी पुन्हा लॉकडाऊन म्हणजे एक प्रकारे मृत्यू घंटाच म्हणावी लागेल. शिवाय कोरोनाचे रुग्ण वाढले तर आरोग्य यंत्रणाही कोलमडून पडेल. कारण अगोदरच या आरोग्य यंत्रणेवर भयंकर ताण आहे, त्यात आणखी रोज दोन ते तीन हजार रुग्णांची भर पडू लागली. तर सगळ संपलच म्हणावं लागेल आणि म्हणूनच लवकरात लवकर कोरोनावरची लस येणे गरजेचे आहे. आम्हाला एकाच गोष्टीचे आश्चर्य वाटते आणि ते म्हणजे पर ग्रहावर पाय ठेवण्याइतपत विज्ञानाने प्रगती केलीय असे असताना कोरोना वर लस शोधण्यात जगातल्या शास्त्रज्ञांना यश का येत नाही? कोरोना येवढा भयंकर आहे का? आणि तसे असेल तर पृथ्वी तलावरील मनुष्य जातीचा अंत निकट आलाय असेच म्हणावे लागेल. मग ज्या जगाने विज्ञानाच्या जोरावर एवढी प्रचंड प्रगती केलीय त्या जगाने कोरोना समोर अक्षरशः हात टेकले असेच असे समजायचे का? कारण जागतिक आरोग्य संघटना सांगतेय की कोरोनवर लस यायला आणखी २ वर्ष लागतील तर आमचे आरोग्यमंत्री सांगत आहेत की जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात लस येईल, आता खरे कोणाचे मानायचे? मात्र एक गोष्ट खरी आहे की येणारा काळ अत्यंत भयंकर असेल तो किती माणसांचा बळी घेईल सांगता येणार नाही. सरकारच्या एका चुकीमुळे देशावर आज ही परिस्थिती ओढवली आहे. पहिला लॉकडाऊन फसला आणि त्यानंतर पुढचे सगळे गणितच बिघडून गेले. त्यामुळे आता पुन्हा जरी लॉकडाऊन केला आणि त्याची व्यवस्थित अंमलबजावणी सरकारला करता आली नाही तर कोरोनाच फैलावं थांबणार नाही. त्यामुळे सरकारला यापुढे आणखी कठोर पावले उचलावी लागणार आहेत. मुंबई सारख्या शहरात सरकारने भलेही संचारबंदी केलेली असली तरी एका विशिष्ठ समाजाचे काही लोक अजूनही सरकारचे नियम पाळत नाहीत. त्यांच्या मोहल्यामध्ये लहानथोर महिला, कुणीही मास्क वापरत नाहीत. तसेच बिनधास्त बाहेर फिरतात आणि पोलिस त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत हे चित्र बदलायला हवं. सरकारने आता पोलिसांना थोड फ्रिडम द्यायला हवा, तरच पोलिस मास्क न घालणाऱ्या लोकांवर किंवा सोशल डिंटेन्स न पाळणाऱ्या लोकांवर प्रभावी कारवाई करू शकतील. भारतात तबलिकी समाजाच्या लोकांनी मरकजचे आयोजन करून देशात कोरोना पसरवला आणि आता परिस्थिती हाताबाहेर गेलेली असताना सुद्धा सरकारचे नियम पाळायला तयार नाहीत. मास्क न घालता कुठेही फिरतात, कुठेही गर्दी करतात, कोणाचेही एकात नाहीत. त्यामुळे सरकार अजून किती दिवस यांच्या बाबतीत डोळेझाक करणार आहेत? पोलिसांनी आता सर्वात प्रथम याच लोकांकडे लक्ष द्यायला हवे. कारण हे लोक कुणाचही एकत नाहीत. सरकारच्या नियमांना, मुख्यमंत्र्यांच्या आव्हानाला फाट्यावर मारून स्वतःच्याच धुंदीत कुठेही फिरत आहेत आणि अशा लोकांमुळेच मुंबई सारख्या मोठ्या शहरात कोरोणाच प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सरकारवर लॉकडाऊन करण्याची पाळी येणार आहे. त्यामुळे सरकारने केवळ सुरक्षेच्या दृष्टिकोनातूनच सरकारी नियम न पाळणाऱ्यांकडे बघावे आणि सरकारच्या कारवाईकडे कुणीही जाती धर्माच्या चष्म्यातून बघू नये. कारण कोरोना कुणाची जात धर्म बघून बळी घेत नाही. त्याने सगळ्याच जाती धर्माच्या लोकांचे बळी घेतले आहेत. तेंव्हा ज्यांच्यामुळे पुन्हा लॉकडाऊन करण्याची पाळी येणार आहे त्यांना आता तरी आवर घालावा. कारण हे जर असेच वागत राहिले आणि सरकारने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर कोरोनाचा उद्रेक होऊ शकतो आणि त्याचे परिणाम कोट्यावधी निरोगी लोकांना भोगावे लागू शकतात. कारण कोरोन रुग्णांची संख्या जसजसी वाढतेय तसतसा आरोग्य यंत्रणेवर ताण येतोय. रुग्णालये कोविड सेंटर अपुरे पडत आहेत. त्यामुळे हे जर असेच राहिले तर पुढे कस होणार याची सरकारला चिंता लागून राहिलेली आहे. आरोग्याच्या संकटकाळात कुणीही जात धर्म पंथ भाषा याचा विचार करायचा नसतो, तर प्रत्येकाने आपली जबादारी ओळखून कोरोना विरुद्धच्या या लढाईत सामील व्हायचे आहे. त्यासाठी सरकारने ज्या काही उपाय योजना केल्या आहेत जे काही नियम घालून दिलेले आहे त्याचे काटेकोरपणे पालन करायला हवे. तरच आपण या संकटातून मुक्त होऊ शकतो. हे संकट दिवसेंदिवस गंभीर बनत चालले आहे. कारण यावर अजून औषध सापडलेले नाही. संपूर्ण जगातले कोरोन प्रतिबंधक औषधावर संशोधन करीत आहेत. काही देशांनी लस तयार केली आहे. पण त्याच्या चाचण्या पूर्ण व्हायला अजून काही काळ लागू शकतो. अशावेळी खबरदारी बाळगणे हाच कोरोनावर सर्वात परिणामकारक उपाय ठरू शकतो. शेवटी आपल्या आरोग्याची आपणच काळजी घ्यायला हवी. जोवर कोरोना प्रतिबंधक लस मार्केट मध्ये येत नाही, तोवर कोरोनापासून स्वतःला वाचवायला हवे. कारण हा सासर्गजन्य रोग असल्यामुळे तो कधीही कुणालाही होऊ शकतो आणि कोरोनाचे विषाणू तोंडावाटे, नाकावाटे तसेच डोळ्यातून सुद्धा माणसाच्या शरीरात प्रवेश करू शकतात. त्यामुळेच सरकार मास्क वापरण्याची सक्ती करीत आहे. त्याला लोकांनीही तितकाच प्रतिसाद द्यायला हवा. अन्यथा नाईलाजाने जर सरकारने पुन्हा लॉकडाऊन केला तर पुन्हा सर्व व्यवहार बंद होतील. माणसांच्या दैनंदिनी जीवनावर मर्यादा येतील. अगोदरच चार महिन्याच्या लॉकडाऊनमध्ये लोकांनी खूप काही सहन केले आहे तशी वेळ पुन्हा येऊ नये.

# आता गरज संयमाची!




**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

मराठा आरक्षण हा मराठा समाजाच्या दृष्टीने किती जरी जिव्हाळ्याचा विषय असला तरी सरकार आणि विरोधी पक्ष सोबत असताना मराठा आरक्षणाची लढाई निश्चितपणे जिंकता येईल असा विश्वास मराठा समाजाला असायला हवा आणि त्यासाठीच संयम राखणे आवश्यक आहे. कारण सगळ्या गोष्टी जेंव्हा तुमच्या बाजूने असतात तेंव्हा विनाकारण रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची आवश्यकता नसते. आंदोलन केंव्हा केले जाते जेंव्हा सरकार तुमचे ऐकून घेत नाही. सरकारकडून तुम्हाला न्याय मिळत नाही. तेंव्हा आंदोलन करायला हरकत नाही. पण राज्यातील मागील सरकारने प्रयत्नांची शर्थ करून मराठा आरक्षण मुंबई उच्च न्यायालयातून मंजूर करून घेतले. तत्पूर्वी विधिमंडळात मराठा आरक्षणाचा एकमताने ठराव मंजूर करून घेतला. आताचे सरकारही सर्वोच्च न्यायालयात आरक्षण टिकवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करीत आहे. मग सरकारच्या विरोधात आंदोलने कशासाठी? केवळ शक्ती प्रदर्शनासाठी जर हे सगळ केलं जाणार असेल तर ते योग्य नाही. आज सरकार कोरोनाच्या भयंकर संकटाशी लढत असताना राज्यातील वेगवेगळे समाज जर अशा प्रकारे विनाकारण आंदोलने करून सरकारवर दबाव टाकणार असतीलल आणि सरकारची सर्व ताकत अशी आंदोलने रोखण्यासाठी खर्च होणार असेल तर कोरोनाच्या संकटाचा मुकाबला कसा करणार? मराठा नेत्यांनी याचा विचार करणे आवश्यक आहे. मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्यानंतर महाराष्ट्र सरकारने हे आरक्षण टिकवण्यासाठी सर्व ते प्रयत्न केले. ज्या वकिलांनी उच्च न्यायालयात मराठा आरक्षण टिकवण्यासाठी न्यायालयीन लढाई लढले आणि आरक्षण मंजूर करून घेतले. त्याच वकिलांची फौज सर्वोच्च न्यायालयातील लढतीसाठी कायम ठेवण्यात आली आहे.

मराठा आरक्षणाचा प्रश्न घटनापिठाकडे नेताना मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालय स्थगित देईल असे कुणालाही वाटले नव्हते. पण जे काही घडले ते अनपेक्षित होते. आता सरकार आणि विरोधी पक्ष एकत्र येवुन यातून कसा कायदेशीर मार्ग काढायचा यासाठी प्रयत्न करीत असताना मराठा क्रांती मोर्चाच्या लोकांनी रस्त्यावर उतरून लोक प्रतिनिधींच्या घरासमोर तमाशा करणे, दुधाचे टँकर अडवून शहरी भागातील लोकांची गैरसोय करणे कितपत योग्य आहे. आता कशासाठी आंदोलन करताय? आता तुमच्यावर कसला अन्याय झालाय? तसे पाहता आरक्षणाच्या बाबतीत जर कुणावर अन्याय झाला असेल तर तो मुस्लिम समाजावर! कारण तत्कालीन आघाडी सरकारने मराठ्यांना जेंव्हा १६ टक्के आरक्षण जाहीर केले तेंव्हा मुस्लिम समाजालाही ५ टक्के आरक्षण दिले होते. पण त्यांना दिलेले आरक्षण टिकवण्यासाठी ना सरकारने प्रयत्न केला ना विरोधी पक्षाने! त्यामुळे आरक्षणाच्या बाबतीत जर खरा अन्याय कोणावर झाला असेल तर तो मुस्लिम समाजावर त्यामुळे त्यांनी आंदोलन केले असते तर ते समजण्यासारखे होते. पण मराठा आरक्षणासाठी झाडून सगळे पक्ष आणि यंत्रणा काम करीत असताना आणि मराठा आरक्षणाला मुस्लिम समाजास कोणाचाही विरोध नसताना मराठा समाजाने रस्त्यावर उतरून आंदोलन करणे योग्य नाही. त्यातून विनाकारण तणाव निर्माण होऊ शकतो. तसेच कोरोनाशी झुंजनाऱ्या पोलिस यंत्रणेवर दबाव येऊ शकतो. म्हणूनच मराठा समाजाने संयम पाळला गरजेचे आहे. मराठा आरक्षणाला सरकारने स्थगिती दिलेली नाही, तर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. असे असताना सरकारच्या विरोधात आदळआपट कशासाठी? कारण उद्या जर का सर्वोच्च न्यायालयाला वाटले की मराठा आंदोलक न्याय पालिकेचा विरोधात आंदोलने करून न्यायपालिकेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहे, तर त्याचा मराठा आरक्षणाच्या घटना पीठासमोरच्या सूनवणीवर परिणाम होऊ शकतो आणि कदाचित घटना पीठ मराठा आरक्षणाच्या मुद्यावर वेगळा विचार करू शकते. हा संभाव्य धोका लक्षात घेऊन मराठा आंदोलकांनी संयम राखवा आणि न्यायालयीन लढाईत सरकारला सहकार्य करावे, यातच मराठा समाजाचे आणि मराठा आरक्षणाचे हित आहे.

जर कुणाचाही मराठा आरक्षणाला विरोध नाही, तर मग हे सगळं कशासाठी चाललंय असा सवाल आज संपूर्ण महाराष्ट्र मराठा क्रांती मोर्चाच्या नेत्याना विचारतोय. आज महाराष्ट्रात वेगवेगळ्या विषयावरून विनाकारण वाद निर्माण केले जात आहेत. मग ते सुशांत सिंह राजपूत प्रकरण असो की कंगना प्रकरण असो. या फालतू प्रकरणांमुळे सरकारच लक्ष विचलित केलं जात आहे. त्याचा कोरोना विरुद्धच्या लढाईवर अर्थातच परिणाम होऊ शकतो. अशात जर मराठा क्रांती मोर्चाने रस्त्यावर उतरून आंदोलन केले तर सरकारच लक्ष त्याकडे डायवर्ट होईल. कारण शेवटी रस्त्यावरच्या आंदोलनातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतो म्हणूनच न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत मराठा समाजाने थोडा धीर धरावा. इतकी वर्ष धीर धरला आता आणखी काही महिन्यांचा तर सवाल आहे. शेवटी सब्र का फळ मोठा होता है हे मराठा आंदोलकांनी ध्यानात ठेवावे.

**(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)**

# मनी मेकिंग ॲप: टाळेबंदीच्या काळात पैसे कमविण्याचा मार्ग

**दिशायन**



कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गामुळे मार्च अखेरीपासून टाळेबंदी करण्यात आली. टाळेबंदीमुळे सर्वच नागरिकांची आर्थिक घडी कोलमडली. वर्क फ्रॉम होम' कामाच्या पद्धतीला सुरुवात झाली. 'वर्क फ्रॉम होम'ची सुविधा नव्हती त्या नागरिकांच्या नोकऱ्या गेल्या, तसेच कंपनीत आलेल्या आर्थिक अडचणीमुळेदेखील अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. घरातून काम करणाऱ्या व्यक्तींचे पगार अर्धे झाले. अशावेळी घरबसल्या सोप्प्या पद्धतीने पैसे कमावण्याकडे लोकांचा कल वाढला. टाळेबंदी दरम्यान मनी मेकिंग ॲप्सच्या वापरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले. टाळेबंदीच्या काळात वेगवेगळ्या जॉनरच्या ॲप्सपैकी मनी मेकिंग ॲप सर्वाधिक डाऊनलोडेड आणि वापरण्यात आलेले ॲप ठरले आहेत.

डिजिटल मीडियाचा नागरिकांवर प्रभाव वाढल्यामुळे ॲप वापर वाढला आहे. सध्या भारतातले ७७ टक्के नागरिक इंटरनेटसह स्मार्टफोन वापरत आहेत. हे प्रमाण २०१८-१९ च्या तुलनेत ३६ टक्क्यांनी वाढले आहे. तर स्मार्टफोनचा तालुका, गावस्तरावरील वापर २५ टक्क्यांनी वाढला आहे, अशी माहिती स्टॅटेस्टीका या जर्मन मार्केट रिसर्च करणाऱ्या कंपनीच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात दिली आहे. वाढत्या वापरामुळेच ऑनलाईन उपलब्ध असलेल्या विविध माध्यमांचा, टूल्सचा वापरही वाढला आहे. गेल्या ३ ते ४ वर्षापासून मनी अर्निग किंवा मनी मेकिंग ॲपचे प्रस्त वाढत चालले आहे. या ॲपमध्ये विविध सोप्पे टास्क दिलेले असतात, ते पूर्ण केले की त्याचे पैसे मिळतात. ही या ॲपची मूलभूत संकल्पना आहे.

**• ॲपववर कशामुळे पैसे मिळतात?•**

कोणतेही मनी मेकिंग किंवा मनी अर्निग ॲप डाऊनलोड करून साईन अप करणे, स्वत:चे प्रोफाईल पूर्ण भरणे, ॲपवर रोज हजेरी लावणे, दिले गेलेले सर्वेक्षण भरणे, खेळ खेळणे, व्हिडीओ किंवा जाहिराती पाहणे, सांगितलेले ॲप डाऊनलोड करणे, रेडिओ ऐकणे, प्रशनोत्तरे-गणिते सोडवणे, इतर दिलेले वेगवेगळे टास्क पूर्ण करणे, माहिती शेअर करणे आणि ॲप रेफर करणे इत्यादी मार्गाद्वारे मनी मेकिंग ॲपवरुन पैसे कमावता येतात.

ॲपमध्ये दिलेल्या काहीच टास्कचे किंवा कामांचे थेट पैसे मिळतात, तर बहुतांश कामांचे पॉईंटस मिळतात. ज्या पॉईंट्सचे रुपांतर पुढे पैशांमध्ये होते. उदाहर्णार्थ १० पॉईंट्स म्हणजे १ रुपया होय. प्रत्येक ॲपचे नियम आणि अटी वेगळे असतात. त्यामुळेच किती पॉईंट्स म्हणजे किती पैसे, किती पैसे ॲपच्या अकाऊंटमध्ये जमा झाल्यामवर आपल्या बँकेत ट्रान्सफर करू शकतो, दिवसाला किंवा आठवड्याला किती पैसे ट्रान्सफर करण्याचे लिमिट आहे हे सर्व नियम ॲपमध्ये दिलेले असतात. सामान्यत: पैसे पेटीएम, पेपालद्वारे ट्रान्सफर करता जातात. भारताबाहेरील ॲपमध्ये पैसे युएस डॉलर्समध्ये दिले जातात. तसेच पैशांऐवजी कमावलेल्या तेवढ्याच पैशांचे मोठमोठ्या शॉपिंग ब्रँडचे गिफ्ट वाऊचर्सही मिळतात. तर काही वेळा तेवढ्याच पैशात फोन रिचार्ज करून मिळतो.

**• टाळेबंदीत ॲपचा वापर वाढला •**

'एमपीएल', 'टॅपटॅप', 'ई-वॉर', 'बिग कॅश', 'बिग टाईम', 'झुपीगोल्ड', 'लोको', 'प्लेमेंट' इत्यादी गेमिंग ॲप आहेत. 'टाईमबक्स', 'पेडईरा', ग्रॅबपॉईंट', 'झुमबक', 'स्वॅगबक्स', 'बिटुरो', 'गुगल ओपिनियन रिवॉर्ड' इत्यादी सर्वेक्षण ॲप आहेत. तर 'मेकमनी', 'अर्नमनी', '४फन', 'प्राईमकॅश', 'वनॲड', 'पेबॉक्स', 'रोझधन', 'व्हीक्लिप', 'डेटाबडी', 'मॅथकॅश', 'पॉकेटमनी', 'मूकॅश', 'पर्कॲप', 'रेडिओ अर्न', 'टॉपक्विझ' इत्यादी ॲपमध्ये खेळ, सर्वेक्षण आणि इतर सर्व प्रकारची कामे असतात. सर्व प्रकारचे ॲप विशिष्ट कालावधीनंतर अपडेट होतात, म्हणजेच पैसे कमावण्याचे नवे नवे मार्ग ॲपमध्ये आणले जातात. तसेच या सर्व ॲपमध्ये पैसे मिळतात याचा पुरावाही दिलेला असतो. हे ॲप अमेरिकी, युरोपीय, जपानी, कोरीयन, चीनी तसेच भारतीय कंपन्यांचे आहेत.

भारतामध्ये मार्च ते ऑगस्ट महिन्यांमध्ये मनी मेकिंग ॲपचा रोजचा वापर ०.२ ते ०.४ टक्क्यांवरुन १.६ ते १.८ टक्क्यांवर गेला आहे. वापरकर्ती व्यक्ती दिवसातून कमीत १२ ते २० वेळा ॲप उघडते असे दिसून आले. तर दिवसातून कमीत कमी २ तास आणि जास्तीत जास्त ९ तास वापर होत असल्याचे दिसते. हा वापर पाचपटीने वाढला आहे. टाळेबंदीच्या काळात ऑनलाईन मिटींग, मनोरंजन, ई-पेमेंट ॲपसह पैसे कमावणारे ॲप सर्वाधिक डाऊनलोडेड ॲप ठरले आहेत. जगभरात या प्रकारचे ॲप दिवसाला ५० हजार वेळा डाऊनलोड झाले. तर भारतामध्ये दिवसाला साधारण ९ हजार ते २५ हजार वेळा हे ॲप डाऊनलोड झाल्याचे ट्रॅकींग सॉफ्टवेअरमध्ये दिसून आले, ही माहिती डिजिटल व्यावसायिक सल्लागार स्वागत रॉय यांनी दिली.

**• ॲप वापरकर्त्यांना कसे पैसे देते? •**

या ॲपच्या कंपन्यांना नागरिकांचा डेटा मिळतो. हा डेटा विकला जातो. गेम, व्हिडीओ बनविणाऱ्या कंपन्यांना गेम प्रदर्शित करण्यासाठी प्लॅटफॉर्म दिल्याचे पैसे आकारले जातात. तसेच रेडिओ, सर्वेक्षण, लेख इत्यादींची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना प्लॅटफॉर्म दिल्याबद्दल पैसे आकारले जातात. या ॲपमध्ये विविध ॲप डाऊनलोड करण्याचे टास्क देण्यात येतात. म्हणजेच त्या ॲपचे प्रमोशन होते. यासाठीही पैसे आकारले जातात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ॲप वापरणाऱ्या व्यक्तींन पैसे मिळतात. हे ऐकून अनेक लोक ॲप डाऊनलोड करून वापरू लागतात. ही एका मार्केटींग स्ट्रॅटेजी आहे. यामुळे ॲपवर मोठ्या प्रमाणात वापरकर्ते असल्याने जाहिराती मोठ्या प्रमाणात मिळतात. यातून कंपीनाला कोट्यावधींमध्ये नफा मिळतो. त्यामुळेच मनी मेकिंग ॲप वारकर्त्यांना पैसे देतात. मात्र कंपनीला होणाऱ्या फायद्याच्या एक टक्काही पैसा दिला जात नाही.

मूळात एमपीएल खेळाचे ॲप वगळता इतर कोणतीच कंपनी आपल्या ॲपची जाहिरात करत नाही. हे फक्त वारपकर्त्याच्या रेफरलवर चालते. वापरकर्त्याच्या रेफरल लिंकवरुन एखाद्या व्यक्तीने ॲप डाऊनलोडकरून ते वापरले. या व्यक्तीने केलेल्या सर्व कामांच्या पैशांचे ३० ते ७० टक्के रक्कम रेफरल लिंक पाठविणाऱ्या वापरकर्त्याला मिळते. हे पैसे काम करणाऱ्या व्यक्तीच्या मोबदल्यातून कापले जात नाहीत. तर ॲप कंपनी रेफरने आलेल्या व्यक्तीने कमावलेल्या पैशांवर नियमाप्रमाणे ठरलेल्या टक्क्यांने पैसे रेफर करणाऱ्याला देते, असे ऑनलाईन एचआर रुटर विवेक सोनटक्के यांनी सांगितले.

**• ॲप वापरताना काळजी घ्या •**

सामाजिक माध्यमांवर नोकऱ्यांबाबत सल्ला देणारे या ॲपची मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करतात. अनेक एचआर रिक्रूटर्स या ॲपच्या सत्यतेचा दावा करतात. अनेक मनी मेकिंग ॲप हे टेस्टेड आहेत. त्यामुळे या ॲपद्वारे खरोखर पैसे मिळतात हे सिद्ध झाले आहे. दिवसाला किमान ४ ते ५ तास दिले तर किमान महिन्याला काही मोबदला मिळू शकतो. तसेच ॲपवर प्रत्येक कामाचे पैसे किंवा पॉईंट्स लिहिलेले असतात. खूपदा ज्या कामावर मोठी रक्कम लावलेली असते, ते फसवे असतात. तर कधी हजार पॉईंट्स म्हणजे १ रुपया वैगरे असे नियम लावतात. अशावेळी एक रुपया कमावण्यासाठीच खूप वेळ, इंटरनेट घालवावे लागते. ही बाब लोकांना फसवी वाटते. तर अशा ॲपपेक्षा नोकरी सल्लागार यांच्याकडून सांगितल्या गेलेल्या ॲप वापरणे योग्य ठरेल. ॲपच्या नावांचे अनेक ड्युप्लिकेट ॲप प्ले स्टोअरवर आहेत. यामुळे ॲप डाऊनलोड करताना गल्लत होऊ शकते. वापरकर्त्या नागरिकांची फसवणूक होऊ शखते. त्यांना पैसे तर मिळणार नाहीच पण त्यांच्या मोबाईलमधील डेटा चोरला जाऊ शकतो. ॲपपमध्ये बँकेचे डिटेल्स भरलेले चोरले जाऊ शकतात. या माहितीतून वेगवेगळ्या प्रकारे वापरकर्त्यांना फसवले जाऊ शकते. तसेच टाळेबंदीच्या काळात सायबर हल्ले वाढले आहेत. फसव्या ॲपद्वारे माहिती मिळवून ती कोणालाही विकून किंवा स्वत: त्याचा फायदा घेऊन फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे ॲप डाऊनलोड करण्यापूर्वी प्ले स्टोअरवर ॲपची सर्व माहिती वाचावी, गुगल रिव्हयू पाहावेत, किती जणांनी डाऊनलोड केले ते पाहावे, रेटींग तपासावी, सुरुवातीला ॲप वापरून मगच स्वत:ची माहिती आणि बँक डिटेल्स भरावेत, असा सल्ला सामाजिक माध्यम विशारद अनुभव सहस्त्रबुद्धे यांनी दिला.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# नाशिकचा 'बुलेटराजा' पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या ताब्यात

**पिंपरी/प्रतिनिधी**

नाशिक शहरातील कुख्यात वाहनचोर 'बुलेटराजा' यास पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने अटक केली आहे. धुळे येथील त्याच्या एका साथीदाराला देखील अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून १७ लाख ७० हजार रुपयांच्या १४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. हेमंत राजेंद्र भदाने (२४) भोरवाडा, सातपूर, नाशिक तसेच त्याचा साथीदार योगेश सुनील भामरे (२४) गरताड, ता. जि. धुळे असे अटकेतील दोघा आरोपींची नावे आहेत.

केटीएम दुचाकी चोरी केलेला चोर भोसरी येथे येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार युनिट एकच्या पोलिसांची दोन वेगवेगळी पथके तयार केली होती. त्या पथकाच्या सापळ्यात आरोपी भदाने याला ताब्यात घेण्यात आले. त्याने १ सप्टेंबर रोजी धावडेवस्ती, भोसरी येथून केटीएम दुचाकी चोरी केली असल्याचे पोलिस पथकाजवळ कबूल केले आहे. पिंपरी - चिंचवड व पुणे परीसरातुन बुलेट, एफझेड, केटीएम,पल्सर अशा महागड्या दुचाकींची तो चोरी करत असे. चोरी केलेल्या दुचाकी त्याने बीड, अहमदनगर, धुळे, औरंगाबाद




या भागात विक्री तसेच लपवून ठेवल्या असल्याचे तपासात समोर आले आहे. यापैकी १० बुलेट, दोन एफझेड, एक केटीएम व एक पल्सर अशा एकुण १४ दुचाकी पोलिसांनी त्याच्याकडून हस्तगत केल्या आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी, एमआयडीसी भोसरी, पुणे येथील भारती विद्यापीठ, सहकारनगर, चतुःश्रृंगी, हडपसर, नाशिक सरकारवाडा, अंबड या पोलीस स्टेशनमधील वाहनचोरीच्या गुन्ह्यांची अशाप्रकारे उकल झाली आहे.

पिंपरी - चिंचवडचे पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश तसेच अप्पर पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे तसेच गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त सुधीर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त आर. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट एकचे व.पो.नि. उत्तम तांगडे, स.पो.नि. गणेश पाटील, पीएसआय काळुराम लांडगे, पोलीस कर्मचारी प्रमोद लांडे, बाळू कोकाटे, अमित गायकवाड, नितीन खेसे, गणेश सावंत, विजय मोरे, प्रमोद गर्जे, मारूती जायभाये, विशाल भोईर, राजेंद्र शेटे, नागेश माळी यांच्या पथकाने या कारवाईत परिश्रम घेतले.

आरोपी भदाने हा वाहनचोरी करणारा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर या अगोदर नाशिक जिल्ह्यात ३५ व ठाणे शहर येथे दोन असे ३७ गुन्हे दाखल झालेले आहेत. लॉकडाऊन काळात आरोपी नाशिक येथून पुण्यात येऊन महागडी दुचाकी चोरी करून ती बीड, धुळे, नाशिक या भागात जावून विक्री करत असे. कागदपत्र नंतर देतो, फायनान्सची गाडी आहे असे विविध कारणे ग्राहकांना सांगून तो वेळ मारुन नेत होता. या विक्रीची कामे तो त्याचा साथीदार योगेश भामरे याच्या मदतीने करत होता. फेसबुक व मेसेंजरच्या माध्यमातून आरोपी भदाने ग्राहकांशी संपर्क साधत असे. गाडी विक्री झाल्यावर चॅटिंग तसेच मेसेज लगेच डिलीट करीत असे. आरोपी भदाने याला बुलेटसारख्या महागड्या दुचाकींचे आकर्षण होते. सध्या अशा दुचाकींना मागणी असल्यामुळे त्याने अशा महागड्या दुचाकींवर लक्ष केंद्रीत केले होते.

पार्किंग अथवा सार्वजनिक ठिकाणी पार्क केलेल्या दुचाकींचे आरोपी एका रॉडच्या साह्याने हँडल लॉक तोडून दोन वायरी जोडून दुचाकी ताब्यात घेत पसार व्हायचा. ती दुचाकी विक्री करताना त्याची किंमत ५० ते ६० हजार रुपये सांगून 'ॲडव्हान्स' रुपात तो अवघे १२ ते १५ हजार रुपये घेत असे. दुचाकी संबंधित ग्राहकाच्या ताब्यात दिल्यानंतर तो ग्राहकाशी संपर्क तोडून टाकत असे. चोरलेल्या कित्येक दुचाकींची किंमत सरासरी दोन लाखांपर्यंत आहे. या गुन्ह्यात अजून काही जणांचा यात समावेश आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

# नरखेड गावात सख्या मावस भाऊ व बहीण प्रेमप्रकरणामुळे केली आत्महत्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील नरखेड गावात आपल्या प्रेमप्रकरणाबद्दल माहिती घरच्यांना समजली तर आपल्याला विरोध होईल, या भीतीमुळे नात्याने मावस भाऊ बहीण असलेल्या एका प्रेमीयुगुलाने नैराश्याने नरखेड येथील एका शेतकऱ्यांच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गुरुवारी पहाटे तीनच्या वाजण्याच्या सुमारास गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपविली.

यावाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, नरखेड गावातील प्रशांत रविंद्र शिंदे (१९) व प्रतीक्षा समीर शिंदे (१४) या दोघांचे चोरीचोरी चुपकेचुपके प्रेमसंबंध होते. याची माहिती घरच्यांना मिळाली तर आपल्याला याबाबत प्रखर विरोध होईल. या भीतीने बुधवारी रात्री हे दोघेही घरातून निघून गेले आणि पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास नरखेड येथील बाळासाहेब पाटील यांच्या शेतातील बांधावरील लिंबाच्या झाडाला मुलाने ओढणीने व मुलीने दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सदर घटनेची माहिती मोहोळ पोलिसांना कळताच घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक संतोष इंगळे व सहाय्यक पोलीस निरीक्षक आशुतोष चव्हाण यांनी घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा करून दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी मोहोळ ग्रामीण रुग्णालयामध्ये आणले. दरम्यान ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात मुलाच्या व मुलीच्या नातेवाईकांनी हंबरडा फोडत आक्रोश केल्याचे चित्र दिसत होते. प्रशांतचे शिक्षण बारावीपर्यंत पुणे येथे झाले होते. त्याच्या आई-वडिलांचे तो लहान असतानाच निधन झाले होते. त्याचा उदरनिर्वाह चुलते करीत होते. लॉकडाऊन काळात तो नरखेड येथे आजीकडे राहण्यास आला होता, तर प्रतीक्षा नरखेड येथे दहावीच्या वर्गात शिकत होती. या घटनेची माहिती पोलीस पाटील अरुण पाटील यांनी दिली असून याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास मोहोळ पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक संतोष इंगळे करीत आहेत.



पोउनि संतोष इंगळे

# अल्पवयीन मुलीचे लग्नाचे आमिष दाखवून अपहरण

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील गावात एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेण्यात आल्याची तक्रार मुलीच्या कुटुंबीयांनी केली होती. चार दिवसांनंतर ही मुलगी स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाली. मला कुणीही पळवून नेले नव्हते. मला पसंद नसलेल्या मुलाबरोबर लग्न लावणार असल्याने आई वडिलांवर नाराज होऊन मी दुसऱ्या गावात नातेवाईकांकडे राहण्यासाठी गेले होते. असा जबाब मुलीने दिला होता कुटुंबियांना तो मान्य नव्हता त्यामुळे घरी नेण्यास त्यांनी साफ नकार दिला. त्यानंतर या मुलीची रवानगी बाल निरीक्षण गृहात करण्यात आली. दुसऱ्या दिवशी या मुलीची आजी स्वतः मंद्रुप पोलीस ठाण्यात हजर झाली तिने आपल्याकडे मुलगी आली नव्हती ती खोटे बोलत असल्याचे सांगितले. तक्रारीनुसार मुलीची वैद्यकीय चाचणी करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला. परंतु मुलीने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर तिची रवानगी पुन्हा बाल निरीक्षण गृहात केली. पोलिसांनी दुसऱ्यांदा मुलीचा जबाब घेताना तिने पहिला दिलेला जबाब बदलला लग्नाचे आमिष दाखवून आपले अपहरण करण्यात आले. त्यानंतर अत्याचार केला असा जबाब पोलिसांना दिला. वैद्यकीय चाचणी ही करून घेतली नव्या जबाबनुसार दोघांवर अपहरण व अत्याचाराचा गुन्हा मंद्रुप पोलीस ठाण्यात झाली आहे. एक आरोपी मिळाला आहे त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

# पालघर जिल्ह्यात २० सप्टेंबर २०२० रोजी होणाऱ्या 'प्लस पोलिओ' मोहिमेची यशस्वी अमलबजावणी करण्यात येणार-डॉ.माणिक गुरसळ

**पालघर/प्रतिनिधी**

२० सप्टेंबर २०२० रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम पालघर जिल्ह्यातील डहाणू, पालघर आणि वसई या तीन तालुक्यांमध्ये आयोजित करण्यात आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने सन १९८८ मध्ये पोलिओ निर्मूलनाचे ध्येय निश्चित केले आणि त्यानुसार राज्यात सन १९९५ पासून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम दरवर्षी राबविण्यात येत आहे.




पालघर ग्रामीण व वसई महानगरपालिका क्षेत्रातही ही मोहीम दरवर्षी यशस्वी रित्या राबविली जाते. सर्व बालकांना विहित वयात प्राथमिक लसीकरण, नियमित सर्वेक्षण, आणि पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अंतर्गत ० ते ५ वर्षाखालील सर्व बालके संरक्षित करणे ही पोलिओ निर्मूलनाच्या यशासाठी असलेली त्रिसूत्री पालघर जिल्ह्यात नियमितपणे राबविले जाते त्यानुसार या २० सप्टेंबर रोजी होणाऱ्या लसीकरण मोहिमेला देखील सर्व पालकांनी उस्फुर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी केले.

पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची टास्क फोर्स बैठक जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे आयोजित केली होती त्यावेळी ते बोलत होते. पोलिओ बाबत अधिकाधिक जनजागृती व्हावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी सरपंच नगराध्यक्ष नगरसेवक पोलीस पाटील जिप सदस्य ग्रापं सदस्य तसेच इतर सर्व लोकप्रतिनिधी यांनी मोहिमेचे उद्घाटन करावे असे विनंतीवजा आवाहन देखील यावेळी जिल्हाधिकारी यांनी केले. कोरोना काळात लहान बालकांना लसीकरण करते वेळी शासनाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करूनच लसीकरण केले जाणार आहे. बुथवर सॅनिटायझर, हात धुण्याची व्यवस्था लसीकरण करणाऱ्या कर्मचारी स्वयंसेवक यांनी मास्क आणि ग्लोव्हज घालणे, प्रत्येक लाभार्थ्याला लसीकरण केल्यानंतर आपल्या हात सॅनिटाईज करणे, येणाऱ्या लाभार्थ्यामध्ये योग्य ते अंतर ठेवण्यात येणे, सामाजिक अंतर पाळणे, घर भेटीच्या वेळेस सॅनिटायझर मास्क व ग्लोव्ज सोबत घेऊन जाणे, लहान बालकांना स्पर्श न करता केवळ मातेच्या स्पर्शानेच बालकांना लस पाजणे, व इतर अनेक नियम यावेळी पाळण्यात येऊन लसीकरण करणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दयानंद सूर्यवंशी यांनी दिली अशांच्या माध्यमातून नियमित पणे लहान बालकांना लसीकरणासाठी प्रोत्साहित करण्याचे काम केले जाते अशी माहिती यावेळी अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मिलिंद चव्हाण यांनी दिली. सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.००० या वेळेत लसीकरण मोहीम बुथवर राबवली जाईल. त्यानंतर ग्रामीण भागात ३ दिवस व शहरी भागात ५ दिवस याप्रमाणे घरभेट देऊन राहून गेलेल्या बालकांना लस देण्यात येईल. या बैठकीस अति.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र केळकर, WHO चे प्रतिनिधी डॉ.किशोर चव्हाण, सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सागर पाटील. वैद्यकीय अधीक्षक डॉ.दिनकर गावित उपस्थित होते.

# सहा किलो गांजा सह तिघा जणांना अटक

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी शहरातील शांतीनगर पोलीस ठाणे क्षेत्रात गुन्हे वाढत असतानाच अनैतिक धंदे सुध्दा मोठ्या प्रमाणावर फोफावले असून जब्बार कंपाऊंड येथे गांजा घेऊन आलेल्या रिक्षा चॉकसह दोन जणांना ताब्यात घेण्यात यश मिळविले आहे. जब्बार कंपाऊंड येथे गांजा विक्री साठी घेऊन येणार असल्याची मगिती शांतीनगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ममता डिसोझा यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळाली असता वरील ठिकाणी गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक भिका भवर यांच्या नेतृत्वाखालील पो. हवा. चौधरी, पो. ना.राणे, इथापे, वेताळ, वडे, पो.शि.पाटील, कुंभार, इंगळे, मोहिते, हरणे या पोलीस पथकाने जब्बार कंपाऊंड या ठिकाणी सापळा रचला असता त्याठिकाणी एक रिक्षा व त्यामध्ये दोन इसम आले असता त्यांना ताब्यात घेऊन रिक्षाची झडती घेतली असता रिक्षा मध्ये ६ किलो १२८ ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला असून एकूण ६० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तिघां विरोधात एनडीपीएस ॲक्ट सन १९८५ चे कलम ८ क, २० ब, २२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात प्रतिपालकत्व योजनेची अंमलबजावणी होणार

**पालघर/प्रतिनिधी**

अनाथ मुलांना कुटुंबाचे प्रेम मिळवून देण्यासाठी महिला व बालकिवास विभागातर्फे प्रतिपालकत्व योजना (Foster Care) राबविण्यात येत असून, पालघर जिल्ह्यासह राज्यातील पाच जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. याबाबत जिल्ह्यात माहिती पोहोचवून इच्छूक कुटुंबांचा सहभाग मिळवावा व अनाथ बालकांना सुरक्षित कुटुंब मिळवून द्यावे, असे निर्देश राज्याच्या महिला व बालविकास मंत्री ॲड.यशोमती ठाकूर यांनी दिले आहेत. अनाथ बालकांना घर मिळवून देण्याच्या कामाइतके दुसरे मोठे कार्य नाही. त्यामुळे प्रतिपालकत्व योजना महत्वपूर्ण आहे. मुलांना (Foster Care) च्या माध्यामातून घर मिळवून दिले, योजनेची नीट अंमलबजावणी झाली तर उद्याची युवा पिढी मानसिक, शारीरिक तसेच सामाजिकदृष्ट्या सक्षम होईल. त्यामुळे या योजनेत जिल्ह्यात जाणीव-जागृती करावी. कुटुंबात राहिल्याने मुलांचा सर्वांगीण विकास होतो, हे लक्षात घेऊन ही योजना अंमलात आली आहे. योजनेच्या तयारीच्या अनुषंगाने या पाच जिल्ह्यातील सर्व बालसंरक्षण यंत्रणांचे ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यातही योजनेच्या यशस्वीतेच्या दृष्टीने सर्वकष प्रयत्न व्हावेत, असे निर्देश राज्याच्या महिला व बालविकास मंत्री ड.यशोमती ठाकूर यांनी दिले आहेत. प्रायोगिक अर्थात प्रतिपालकत्व स्वीकारून योजनेत भाग घेऊ इच्छिणारे पालक महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या https://wcdcommpune.org या संकेतस्थळावर अर्ज करु शकतील.महिला व बालविकास विभागाच्या अधिनस्त बालगृहातील अनाथ बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना सुरक्षित कुटुंब, घर मिळवून देणाऱ्या प्रतिपालकत्व (Foster Care) योजना महिला व बालविकास विभागाकडून अंमलात आली आहे. पुणे, सोलापूर, पालघर, मुंबई उपनगर व अमरावती या ५ जिल्हयांत प्रायोगिक तत्त्वावर ही योजना राबविण्यात येत आहे. योजनेत कुटुंबाने बालकांचा तात्पुरत्या स्वरूपात सांभाळ करणे अपेक्षित आहे. या मुलांच्या संगोपनासाठी प्रतिपालकत्व पालकांना दरमहा दोन हजार रूपये देण्यात येणार आहेत. योजनेत प्रत्येक जिल्ह्यात ४० मुलांची निवड करण्यात येणार आहे. असे एका प्रसिद्धी पत्रिकेद्वारे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.


## वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती 'डी' आचोळे, नालासोपारा (पु.)

दुरध्वनी - ७२१९३७०००६/७२१९३७०००९

### जाहिर नोटीस - पु.क्रं. ८५४२

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आचोळे ९ | ७०६/५४ | ८५४१२१ | प्रफुलकुमार जगदिश नारायणसिंह | नीलम दिपक पटेल |
| २ | आचोळे ८ | १४८/७२ | ८५४१२२ | रामकुमार मोर्या | योगेश अनंत पोंगडे/ गणेश अनंत पोंगडे |
| ३ | आचोळे १० | ४५४/२३ | ८५४१२३ | सुरेश रेड्डी | अजय आत्माराम घाग |
| ४ | आचोळे १० | ४५७/१० | ८५४१२४ | शोभा दिनेश शाह व असित शाह | असित दिनेश शाह |
| ५ | आचोळे ८ | १३/६९ | ८५४१२५ | किशोर रामजी खमन | प्रिया धोंडु जंगले / धोंडु पदु जंगले |
| ६ | आचोळे ४ | २१५/१६ | ८५४१२६ | चंद्रकांत राघो राऊत | मनाली महेश पवार |
| ७ | आचोळे ९ | ६६४/६६ | ८५४१२७ | राजेशकुमार ओझा | ओमकार शंकर बागवे / शांती बागवे |
| ८ | आचोळे ५ | ११४/५३ | ८५४१२८ | फातेह मो. खान | रेश्मा नानो कासिम अली |
| ९ | आचोळे ६ | २८८/४१ | ८५४१२९ | शाह मोहम्मद | निलेश भेरू आगरे |
| १० | आचोळे १० | ३२५/३५ | ८५४१३० | मेसर्स सेठ डेव्ह. | राजेशकुमार सकलदेव सिंह |
| ११ | आचोळे ९ | ६३२/१८२ | ८५४१३१ | ए.एम.के. असोसिएट्स | आनंद हरी शानभाग |
| १२ | आचोळे १० | ९/२६ | ८५४१३२ | लुईसा डिसोजा | वलसमा मॅथ्यू |
| १३ | आचोळे २ | २४७/१२० | ८५४१३३ | हेमेंद्र आर. खंडेलवाल | चंद्रशेखर आर. चतुर्वेदी/ पूजा सी.चतुर्वेदी |
| १४ | आचोळे ६ | १८/५२ | ८५४१३४ | मिठाईलाल महानंद दुबे | शरद पी. यादव/ प्रतिमा शरदकुमार यादव |
| १५ | आचोळे १ | १६९/१२३ | ८५४१३५ | अविनाश पुरुषोत्तम गोहील | निर्मला ओमप्रकाश गोहील |
| १६ | आचोळे १० | ३३१/२४ | ८५४१३६ | शहा ॲण्ड शहा कंन्स्ट्रक्शन | हर्षदा एस. यादव/ संतोष आर. यादव |
| १७ | माणिकपुर २/२ | AC२०/५८३१५ | ८५४१३७ | स्मीता व संजय उमाकांत देवरूखकर | भरत बबन खामकर/ अंकुश बबन खामकर |
| १८ | आचोळे १० | ४८/४ | ८५४१३८ | पुनम डिसोजा | अमोद गोकुळ मयेकर/ रश्मी गोकूळ मयेकर |
| १९ | आचोळे ९ | ६३१/११४ | ८५४१३९ | प्रणव ए. देसाई | सुप्रिया अभिषेक सिंह/ अभिषेक रमाशंकर सिंह |
| २० | आचोळे ८ | ६/३६ | ८५४१४० | पी.आर. शिवन पिल्ले | पद्मनाभा व्ही. कांचन |

जावक क्र. वविशम/ कवि/१३/२०२०-२१
दिनांक : ११/०९/२०२०

सही/-
**प्र.सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'डी' आचोळे
वसई विरार शहर महानगरपालिका

21 TO 27 SEPTEMBER 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 19/09/2020 6:55 PM Page 1



# ज्वेलर्सच्या दुकानात दरोड्याचा प्रयत्न फसला

## हातात बंदूक आणि चाकू घेऊन लुटण्याचा प्रकार

**नालासोपारा/प्रतिनिधी**

पूर्वेकडील परिसरात असलेल्या ज्वेलर्सच्या दुकानात मंगळवारी रात्री एक चोरटा हातात बंदूक आणि चाकू घेऊन दरोडा टाकण्याचा प्रयत्न झाला आहे. पण ज्वेलर्स मालकाच्या प्रसंगावधनामुळे लुटण्याचा प्रकार झाला नाही. हा सर्व प्रकार दुकानातील सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे. या प्रकरणामुळे वसई तालुक्यातील पोलिसांमध्ये खळबळ माजली आहे. या गुन्ह्याची उकल होण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कंबर कसली आहे.

नालासोपारा पूर्वेकडील नेमिनाथ हॉस्पिटल जवळील गगनविहार कॉंप्लेक्स मध्ये चेतन बाबूलाल जैन (३०) यांच्या मालकीचे श्री आदिनाथ ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. मंगळवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून एक तरुण आला होता. त्याने नंतर हातात चाकू आणि प्लास्टिकची गन काढून धाक दाखवत माल निकालो असे बोलून सोन्याचे दागिने जबरीने चोरी करण्याचा प्रयत्न केला. दुकानदारांनी विरोध केल्यावर ज्या दुचाकीवरून आला ती सोडून पळून गेला आहे. या प्रकारानंतर वसई तालुक्यातील पोलिसांमध्ये खळबळ माजली आहे. तुळींज पोलिसांनी पंचनामा करत दुचाकी जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

# भाजपच्या पदाधिकाऱ्यावर चाकूने हल्ला

## नालासोपाऱ्यातील घटना, गुन्हा दाखल

**नालासोपारा/प्रतिनिधी**

पश्चिमेकडील परिसरात राहणाऱ्या आणि भाजपाचा पदाधिकारी असलेल्या २६ वर्षीय तरुणावर दिवसाढवळ्या रोडवर आरोपीने क्षुल्लक कारणावरून चाकूने वार करून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नालासोपारा पोलिसांनी खुनाचा प्रयत्न हा गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक केले आहे. नालासोपारा पश्चिमेकडील छेडा नगरमधील विनी हाईट्स मध्ये राहणारा आणि भाजपचा युवा पदाधिकारी ऋतिक संजय पोळ (२६) याच्यावर मंगळवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास चाकूने हल्ला झाला आहे. एस टी डेपो समोरील भाजपचे जिल्हाध्यक्ष राजन नाईक यांच्या ऑफिसच्या बाहेर ऋतिक हा त्याच्या मित्रांसोबत बोलत उभा होता. त्याचवेळी आरोपी योगेश पाटील त्याच्याजवळ येऊन रागाने बघत शिवीगाळ करून पार्किंग मध्ये कचरा टाकतो म्हणून तुला बघून घेतो अशी धमकी दिली. त्याने मी कचरा टाकत नसल्याचे सांगितल्यावर तुला खपवून टाकतो असे बोलून थोड्या वेळाने चाकु घेऊन आरोपी धावत आला. आरोपीने त्याच्या छातीवर वार करून जीवे ठार मारण्याचा उद्देशाने वार केला पण त्याने डावा हात वर केल्याने हाताच्या दंडावर वार होऊन गंभीर जखमी झाला आहे.

पान १ वरून...

### मैत्रिणी विरुद्ध भलतेच करून बसला ...

व्हिडोओ कॉल करुन तिला अश्लिल कृत्य करण्यास भाग पाडले. त्यामुळे ती घाबरून गेली .याबाबत घरात ती कोणाला ती काही सांगू शकत नव्हती. मात्र तिचा या कृत्याचा रेकॉर्डींग केलेला तो अश्लील व्हिडीयो संबधीत तरुणाने रीना च्या भावाला पाठविला होता. आपल्या बहिणीचा तो अश्लील व्हिडीओ बघून त्याची तळपायतील आग मस्तकात गेली. दरम्यान या तरुणाने परत रिनाला फोन करून हा व्हिडीओ सोशल मिडीयावर वायरल करण्याची धमकी दिली .त्यामुळे ती आणखीन घाबरून गेली. इकडे तिच्या कुटुंबातील सदस्य यांना हे कळल्यावर त्यांनी रिना ला पोलीस ठाण्यात जाण्याचा सल्ला दिला. त्यानुसार ती ६ सप्टेंबर रोजी बोरीवली पोलीस ठाणे येथे गेली. तेथील पोलिसांना तिने सर्व हकीगत सांगितली.रीनाच्या तक्रारीवरून बोरिवली पोलिसांनी गु.नों.क्र . ९७२ / २०२० , कलम ३५४ (ड), २९२ (२), ५०४,५०६ भादंवि सह कलम ६६ (क) (ड ) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्ह्याची नोंद केली व पुढील तपास सुरू केला. सदरचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा कक्ष ११ चे प्रपोनि सुनिल माने यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. रईस शेख, स.पो.नि. विशाल पाटील, स.पो.नि. नितीन उतेकर, पो.ह. नितीन शिंदे, महादेव नावगे, राकेश लोटणकर, अजय कदम व महिला पोलीस रीना अनेराव ययांनी सुरू केला .याबाबतची सर्व माहिती त्यांनी वरिष्ठांना दिली होती. त्यानुसार अज्ञात आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांकडुन काही सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्याप्रमाणे संशयित तरुणांचा शोध सुरू झाला होता. सुरुवातीला कक्ष -११, मुंबईचे पथकाने गुन्हयाच्या अनुषंगाने फिर्यादी रीना कडुन या बाबतची माहिती घेतली होती. तेव्हा अज्ञात संशयित तरुणाने बनावट इन्स्टाग्राम अकांऊट सुपीडी १ चा वापर केल्याचे तपासत आढळून आले होते. मग या गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन गुन्हयाचा तांत्रिक तपास जलदगतीने सुरू करण्यात आला. प्रपोनि सुनिल माने यांचे पर्यवेक्षणाखाली स.पो.नि. विशाल पाटील यांनी संशयित तरुणाने तयार केलेल्या बनावट इन्स्टाग्राम अकांऊटबाबतची तांत्रिक माहिती प्राप्त करून त्याचे विश्लेषण केले. तांत्रिक माहितीच्या विश्लेषणातुन ठाणे जिल्ह्यातील कळवा येथील एका तरुणाचे नाव पुढे आले. गुन्हे शाखा ११च्या पथकाची एक टीम तो तरुण राहत असलेल्या ठिकाणी पोहचले. १५ सप्टेंबर रोजी पोलिसांनी त्या संशयित तरुणाला चौकशीसाठी ताब्यात घेतले आणि गुन्हे शाखेच्या कांदिवली येथील कार्यलयात आणले. तिथे या तरुणांची गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कसून चौकशी केली असता तेव्हा त्याने गुन्ह्याची सर्व हकीकत पोलिसांना सांगितली. ती एकूण सर्व आश्चर्यचकित झाले. अक्षय पवार (वय २३) असे या तरुणाचे नाव होते. तो रुम नं २०११/ए , कृष्णा चाळ, इंदिरा नगर, खारेगाव, कळवा, जि. ठाणे या ठिकाणी राहत होता. अक्षय आणि गुन्हतील फिर्यादी तरुणी रीना हे दोघे सन २०१३-१४ मध्ये विरार येथील एका इंजिनियरींग कॉलेजमध्ये इंजिनियरींगचे एकत्र शिक्षण घेत होते. शिक्षण घेत असताना तिथे या दोघांची मैत्री झाली होती. या मैत्रीतुन पुढे या दोघांचे बोलणे, चालणे सुरू झाले. दरम्यान शिक्षण संपल्यानंतर ते आपापल्या घरी आले. तरी ते दोघे एकमेकांच्या संपर्कात होते. मात्र रिनाचे काही फोटो तिच्या ग्रुपमधील मित्रांसोबत असल्याने अक्षयला ही बाब खटकली. त्याला या गोष्टीचा राग आला. या रागाच्या भरात अक्षयने रीनाला धडा शिकवण्याचा चँग बांधला. त्यानुसार तो तयारीला लागला.

रिनाने तिचे मित्रासोबत असलेले काही खाजगी फोटो हे तिच्या ई मेल आयडीवर स्टोर करुन ठेवले होते. ते फोटो अक्षयने परस्पर रीनाच्या संमतीविना ई मेल आयडी वरुन प्राप्त केले. सदर फोटोमध्ये फिर्यादी तरुणी ही तिचे दुसऱ्या मित्रासोबत असल्याचे आढळल्याने त्याचा अक्षयला राग आला होता. हाच राग मनात ठेवून त्याने रीनावर सुड उगविण्यासाठी सुपिड -१ हे बनावट इन्स्टाग्राम अकाऊंट उघडले. तो स्वतः इलेक्ट्रॉनिक इंजिनियरींग पदवीधारक असल्याने त्याला या क्षेत्रातील चांगली माहिती होती. मात्र रीना ला धडा शिकवण्यासाठी त्याने त्या माहितीचा गैरवापर केला. मग त्याने रिनाला या बनावट इन्स्टाग्राम अकांऊटवरून तिचे खाजगी फोटो व्हायरल करण्याची धमकी देवुन, तिला शिवीगाळ करुन व व्हिडोओ कॉल करुन अश्लिल कृत्य करण्यास भाग पाडले. तसेच त्याने या कृत्याचे व्हिडीयो रेकर्डिंग करुन तिच्या भावास पाठवुन सोशल मिडीयावर तो व्हिडीयो वायरल करण्याची धमकी दिली. अशा प्रकारे त्याने सदरचे विकृत कृत्य केल्याची कबुली दिली. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अक्षय पवार याला अटक करून त्याने गुन्हयात वापरलेला मोबाईल फोन जप्त केला आहे. त्याला पुढील तपासकामी बोरीवली पोलीस ठाणेस सुपुर्द करण्यात आले आहे.

अशा प्रकारे गु.प्र.शा.गु.अ.वि, कक्ष -११ च्या पथकाने बोरीवली पोलीस ठाणेस दाखल झालेल्या उच्च शिक्षित तरूणी विरूध्दच्या विनयभंग व धमकी सारख्या गंभीर अपराधाची तात्काळ दखल घेवुन तांत्रिक माहितीच्या आधारे संशयित तरुणाचा शोध घेवुन गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे. ही यशस्वी कामगिरी मुंबई पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) विरेश प्रभु, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण -१) अकबर पठाण व सहाय्यक पोलीस आयुक्त अविनाश शिंगटे यांच्या मार्गदर्शनाखाली गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष -११ चे प्रपोनि सुनिल माने, पो.नि. रईस शेख, स.पो.नि. विशाल पाटील, स.पो.नि. नितीन उतेकर, पो.ह. नितीन शिंदे, महादेव नावगे, राकेश लोटणकर, अजय कदम, म.पो.शि. रिया अणेराव यांनी पार पाडली.

### अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट झाला...

माहेरच्या लोकाबरोबर बोलत असेल म्हणून त्याने त्याकडे दुर्लक्ष केले होते. तशी ती मोकळ्या स्वभावाची असल्याने चेहऱ्यावर तिच्या कायम हसु असायचे ती हसताना तिच्या गालावरची खळी बघुन कुणी ही तिच्या प्रेमात पडेल असे तिचे आरसपाणी सौंदर्य होते. परंतु देखणी बायको ही दुसऱ्याची असते. हे लवकरच आय्याजला समजून आले होते. तो आपल्या सासरवाडीला गेला असताना त्याला तिथल्याच एका पाहुण्याने रेहनाच्या लग्नाअगोदरच्या प्रेमसंबंधाविषयी सांगितले होते. त्यामुळे तो फारच अस्वस्थ झाला होता.

पुढे या बाबत त्याने सहजु रेहानला विचारले असताना तिने तो विषय टाळून लग्नाअगोदर ही आणि लग्नानंतर ही आपले कधी ही कुणाशी ही प्रेमसंबंध नव्हते आणि नाहीत असे ठणकावून सांगून तुझ्या डोक्यातून असले विचार काढून टाक. आणि बायको शिवाय कधी ही कुणावरही कसलाही विश्वास ठेवू नकोस असे सांगितले. तिने त्याला तसे विश्वासाने सांगितल्याने त्याने ही तिच्यावर त्यावेळी विश्वास ठेवला होता. ती ही आता सावध झाली होती. फोनवरून बोलताना ती सावध गिरी बाळगीत होती. दिवसा मागून दिवस जात होते. त्याने आपल्या डोक्यातून तो विषय काढून टाकल्याचे लक्षात येताच ती ही अलिकडे बिनधास्त वागत होती.

आपल्या मोबाईलवरून ती तासन तास कुणाशी तरी बोलत होती. बोलताना हसत होती. याबात आय्याजला वेगळीच शंका येवू लागली होती.तो तिच्यावर बारकाईने लक्ष ठेवून होता. काही दिवसांनी ती त्याला एका तरूणाबरोबर हसत खेळत फिरत असताना त्याला दिसली. त्यावेळी त्याने तिला काही बोलले नाही. त्याने ही गोष्ट मनात ठेवली.त्याने तिचा मोबाईल चेक केला असता. त्या मोबाईलवरती एकाच नंबराचे फोन येत असल्याचे त्याला दिसून आले. तो तरूण कोण त्याचे रेहानशी काय संबंध या विचाराने तो बेजार झाला असताना त्याला बायको रेहनाचे सौरभ जाधव या तरूणाबरोबर लग्नापुर्वी आणि लग्नानंतरही प्रेमसंबंध असल्याची माहिती मिळाली. त्याने या गोष्टीची आता खात्री करून घेतली होती. या कारणातून नवरा बायकोची दररोज भांडणे होऊ लागली होती.तो याचा जाब तिला विचारीत होता. पण ती आपले संबंध मान्य करीत नव्हती. त्याने ही गोष्ट तिच्या माहेरच्या लोकना ही सांगितली होती. पण उलट त्याने तिलासमजावून सांगण्या ऐवजी आय्याज यालाच रेहानावर संशय घेऊ नका म्हणून चार गोष्टी सांगितल्या होत्या. त्यामुळे तो बायको आणि तिच्या माहेरच्या लोकावर ही चिडून होता. नवरा आपल्यावर संशय घेऊन मारहाण करीत भांडण काढत असल्याने ती ही त्याच्यावर चिडत होती.

आता तर ती त्याला उघड उघड भेटत होती. तू मला पंसत नाहीस,मला सौरभ बरोबर लग्न करायचे होते. पण तु माझ्या गळ्यात पडलास म्हणून त्याच्याबरोबर भांडत होती. त्यामुळे आय्याज ही अलिकडे जास्तच दारू पिवू लागला होता. दारूच्या नशेत तो राहत असल्याने कामावर ही जात नव्हता. त्याने एकदा सौरभला भेटून रेहनाला भेटू नकोस नाहीतर याचे परिणाम फार वाईट होतील असे सांगितले होते. त्याच्या सांगण्याकडे सौरभने त्यावेळी दुर्लक्ष केले होते.त्याने त्याला धमकी दिली असली तरी तो त्याच्या बायकोला भेटत होता. उलट त्या दोघांचे लग्नाअगोदरचे संबंध लग्नानंतर अधिकच बहरले होते.आता तर तो घरी नसताना सौरभ तिला भेटायला येत होता. त्या दोघांचे पूर्वी ही शारीरिक संबंध होते. आता तर तो आय्याज घरी नसताना तिच्या घरीच तिच्या शरीराशी खेळत होता. ही गोष्ट आय्याज याला समजली होती. त्याने त्या दोघांना नको त्या अवस्थेत रंगेहात पकडले होते. त्या दिवसापासून आय्याज हा सौरभवर चिडून होता.त्याला काही तरी करून कायमचा धडा शिकवायचा या विचारात तो होता. रेहानाही सांगून ही ऐकत नव्हती. तिच्या अशा उद्दाम आणि बेफिकीर वागण्यामुळे त्याची मान खाली जात होती. म्हणून तो सौरभची गेम करण्याचा प्लॅन करू लागला. या कामासाठी त्याने आपल्या इतर तीन जवळच्या मित्रांची मदत्त घेण्याचे ठरविले होते. त्याने त्या मित्रांना आपल्या बायकोच्या याराला संपवायचे आहे.मला मदत करा असे सांगितले होते. ते ही त्याला मदत करायला तयार असल्याने त्या चौघांनी सौरभला संपविण्याचा कट रचला.

त्यानुसार आय्याज हा सौरभच्या मागावर होता. तो कधी कुठून जातो काय करतो याची संपूर्ण माहिती त्याने घेतली होती. रविवार दि.१३ सप्टेंबर २०२० रोजी दुपारी १.३०च्या दरम्यान सौरभ हा जिल्हा रुग्णालयाच्या परिसरातून जात असताना आय्याज शेख, नयन उर्फ तांडया लोंढे, सोन्या बारधे व अन्य तिघा जणांनी त्याला अडविले. त्याच्याशी बाचाबाची करत त्याला जिल्हा रुग्णालयाच्या परिसरातील पार्किंग परिसरात आणले. तेथे त्या चौघा पाच जणांनी मिळून त्याला मारहाण करायला सुरूवात केली होती. त्यावेळी पार्किंग परिसरात कुणी ही नसल्याने त्याना ही आयतीच संधी मिळाली होती. त्याला ते चौघे पाचजण मारहाण करीत असताना तो बचावासाठी ओरडत होता. त्याची मारहाण चालुच होती. तो एकटा होता. त्याला सोडवयला ही कुणी नव्हते. तो खाली पडला असल्याने ते त्याला लाथा बुक्कांनी मारहाण करीत होते. आय्याजच्या रागाचा पारा जास्तच चढला होता. तेवढयात नयन उर्फ तांडया लोंढे याने आय्याजला गाडीतून कोयता आणून दिला. त्या कोयत्याने सौरभच्या डोक्यात आय्याज याने त्याच्या छातीवर डोक्यावर सपासप वार केले. त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला होता. तो गंभीर रित्या जखमी झाला होता. त्याला त्याने जबर मारहाण करून तेथून पळुन गेले होते. कुणी तरी या घटनेची माहिती सांगवी पोलीसांना दिली होती. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन गंभीर जखमी सौरभ याला उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले. परंतु तेथील उपचारा पुर्वीच त्याचा मृत्यु झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले होते.

पोलीसांनी मयताचा आणि घटनास्थळचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली होती. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची माहिती त्याना मिळाली होती. या घटनेची फिर्याद मयत सौरभ जाधव याचा भाऊ सुशांत व्यंकट जाधव याने सांगवी पोलीसात दिली होती. त्याने आपल्या फिर्यादीत संशयीत आरोपीची नावे पोलीसांना सांगून कोणत्या कारणातून घटना घडली याची माहिती दिली होती.या घटनेतील संशयीत आरोपी पळुन गेले होते. सांगवी पोलीसाबरोबरच या घटनेचा तपास पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा चार युनिटचे पोलीस ही करत होते. या घटनेनंतर संशयीत आरोपी वडगाव मावळ भागात लपले असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाल्याने पोलीसांनी वडगाव मावळ परिसरातून या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी आय्याज शेख,नयन उर्फ तांडया लोंढे याना अटक करून ताब्यात घेतले होते.अन्य तिघेजण फरारी होते. ताब्यात घेतलेल्या आय्याज शेख आणि तांडया लोंढे याच्याकडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केली असता.त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली होती.सौरभ व्यंकट जाधव (वय २८ रा.संजयनगर औंध) याच्या खून प्रकरणी पोलीसांनी सुशांत जाधव याच्या फिर्यादी वरून पोलीसांनी आय्याज नुरमोहम्हमंद शेख (वय २५.रा शिवाजीनगर पुणे) नयन उर्फ तांडया विजय लोंढे (वय १९.रा.दापोडी) व फरार असलेले सोन्या बारंधे व अन्य तिघा विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, व अन्य कलमा खाली सांगवी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला. पोलीसांनी त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्याना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता आणि दुचाकी वाहने जप्त केले. या घटनेचा पुढील तपास सांगवी पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत. लग्नाअगोदरच्या प्रेमसंबंधाना लग्नानंतर जर लगाम घातला गेला नाही तर त्यातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते. प्रेमाची खरी व्यापती आणि महती त्याना कळालेली नसते. बऱ्याच जणांचे प्रेमाच्या नावाखाली विवाहबाहय संबंध चालु असतात. आणि पुढे नको त्या गोष्टीत अडकून संसाराचे वाटोळे होते. म्हणूनच अशा गोष्टीना भरल्या संसरात थारा देवू नये. नाही तर खूनासरखी घटना ही घडतेच हेच या घटनेवरून दिसून येते.

### दारू पिऊन जाब विचारायला जाताच...

आशिष अनिल वाल्मिकी (२२) आणि श्रीनिवास बसप्पा सुगाला (२३) अशी अटक केलेल्या खुन्यांची नावे असून हे सर्व मारेकरी दत्तनगर परिसरात राहणारे आहेत. तर या पाच जणांनी केलेल्या सशस्त्र हल्ल्यात शिवाजी वामन खंडागळे (२५) हा ठार झाला, तर संतोष विलास लष्करे (३४) हा जखमी झाला असून त्याच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या संदर्भात राजू शिवराम धोत्रे (२९) याच्या जबानीवरून रामनगर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी रात्रीच्या सुमारास संतोष लष्कर याच्या मुलीचा वाढदिवस होता. या वाढदिवसाला मेहुणा राजू धोत्रे आणि त्याचा मित्र शिवाजी खंडागळे हे दत्तनगरमध्ये राहणारा संतोष लष्कर याच्या घरी गेले. तेथे ओली पार्टीही झाली. मध्यरात्री सव्वाबाराच्या सुमारास राजू धोत्रे, संतोष लष्कर आणि शिवाजी खंडागळे यांच्यात गप्पा सुरू होत्या. संतोष लष्कर याने मेहुणा राजू धोत्रे याला पाच महीन्यापूर्वी महेश गुंजाळ याने आपणास शिवीगाळ केल्याचे सांगितले.

यामुळे संतापलेल्या राजू धोत्रे याने महेश गुंजाळला फोन करून माझ्या भावोजीला जाब विचारून शिवीगाळ केली. त्यानंतर राजू धोत्रे, संतोष लष्कर आणि शिवाजी खंडागळे विनाहत्यार हे तिघे चालत महेश केणे याच्या प्रगती कॉलेजमागच्या कार्यालयाजवळ राहणाऱ्या महेश गुंजाळ याला जाब विचारण्यासाठी गेले. तेथे खडाजंगी सुरू झाली. तू मला आता फोनवर शिवीगाळ का केली ? असा महेश गुंजाळला जाब विचारला. वातावरण तापल्यानंतर आधीच हत्यारांसह तयारीत असलेल्या महेश गुंजाळ व निखील माने या दोघांनी त्यांच्याकडील लोखंडी रॉडने, जयेश जुवळे व अण्या उर्फ श्रीनिवास सुगाला यांनी त्यांच्याकडील स्टंपने, तर आशिष वाल्मीकी याने त्याच्या हातातील तलवारीने राजू धोत्रे आणि त्याचा भावोजी संतोष लष्कर यांच्या डोके, पाठ, पायावर हल्ला चढवला. तर राजूचा मित्र शिवाजी खंडागळे याच्यावर महेश गुंजाळ व निखील माने या दोघांनी मिळून डोक्यावर लोखंडी रॉडने हल्ला चढवला. या हल्लयात घाव वर्मी बसल्यामुळे शिवाजी खंडागळे हा जागीच ठार झाला. त्यानंतर पाचही हल्लेखोरांनी तेथून पळ काढला. या हल्लयात जबर जखमी झालेल्या राजू धोत्रे व त्याचा भावोजी संतोष लष्कर या दोघांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून ठार झालेल्या शिवाजी खंडागळे याचा मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता कल्याणच्या रुक्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये पाठवून दिला. तर दुसरीकडे या हल्लयातील जखमी राजू धोत्रे याच्या जबानीवरून महेश गुंजाळ, निखील माने, जयेश जुवळे, अण्या सुगाळा, आशिश वाल्मीकी या हल्लेखोरांच्या विरोधात भादंवि कलम ३०२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४१, १४३, १४७, १४८, १४९ प्रमाणे शुक्रवारी पहाटे गुन्हा दाखल केला. वपोनि सुरेश आहेर आणि गुन्हे प्रकटीकरण शाखेचे नारायण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनोजसिंग चौहाण, हवा. शिंदे, जाधव, वाघ, किर्दत्त, खिलारे, पिचड, तोडकर, जाधव या पथकाने गुन्हा घडल्यापासून अवघ्या १२ तासांतच फरार हल्लेखोरांच्या मुसक्या बांधल्या. गुन्ह्यात वापरलेली हत्यारे अद्याप हाती लागली नाहीत. शनिवारी सर्व आरोपींना कल्याण कोर्टात हजर करण्यात येणार असल्याचे वपोनि सुरेश आहेर यांनी सांगितले.

पान ६ वरून...

### शिवसेना आणि भाजपात श्रेयवादाची ...

प्रयत्न केला आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना प्रथमच भिवंडी शहराच्या विकासासाठी कोट्यवधी रुपये मंजूर केले परंतु त्यामधील सुरू असलेल्या कामांना शिवसेना सरकार स्थगिती देऊन भिवंडीकर नागरिकांवर अन्याय करीत असल्याने या उड्डाणपुलाचे खरे श्रेय माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना असल्याने या उड्डाणपुलाचे लोकार्पण भाजपाने केले अशी प्रतिक्रिया भाजपा शहर अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली आहे.

### केंद्रे आणि सावंत यांचा कार्यकर्त्यासह...

कार्यकर्त्यांनी चांगल्या प्रकारे पक्षाचं काम करून आपलं व पक्षाचा नाव मोठं करावं असा सल्ला दिला. तसेच सध्या कोरोणा महामारी लॉक डाऊन मुळे इतर राज्यात खूप कामगार लोक महाराष्ट्रातुन निघुन गेल्यामुळे महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणत रोजगार उपलब्ध होणार आहेत आणि ते सर्व रोजगार महाराष्ट्रातील स्थानिक तरुणांना मिळवा यासाठीही पक्ष काम करत आहे अशी माहिती दिली. तरुण कार्यकर्ते गोविंद केंद्रे ,प्रकाश सावंत यांच्या सोबत सूरज मुंढे, आशिष ढगे, बागोदे बजरंग, बालाजी चव्हाण, अजय सोनकांबळे, शशिकांत कांबळे, व्यंकट अनकले, गणेश अष्टुरे सह इत्यादी कार्यकर्त्यांनी प्रवेश केला या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र श्री संग्रामजी रोडगे तालुका अध्यक्ष मनसे उदगीर, लकी पाटील जिल्हा सचिव मनसे, संतोष भोपळे,नामदेव राठोड आदि उपस्थित होते.

### एटीएम ग्राहकांची फसवणूक करणारे ...

मदत करण्याच्या बहाण्याने त्यांचे कार्ड बदलून त्यांच्या खात्यातील रक्कम परस्पर काढण्याचे गुणे वाढले होते. त्याची गंभीर दाखल पालघरचे पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी घेतली व चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर अप्पर पोलीस अधीक्षक विजयकांत सागर व विरार विभागाच्या उप विभागीय अधिकारी रेणुका बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांचे एक पथक तयार करण्यात आले आणि या पथकाने एटीएम परिसरातील काही सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवून एका संशयिताला ताब्यात घेतले. तसेच त्याचा मोबाईल फोन चालू ठेवून त्या फोनवर आलेल्या कॉलच्या आधार एकाला वसई विरार परिसरातून तर दुसऱ्याला उत्तर प्रदेशातून अटक केली. या कमी पालघर सायबर सेलचे अधिकारी सिद्धेश शिंदे, गव्हाणे, चव्हाण, पाटील दुर्गेस्त यांनी मोलाची मदत केली. अटक आरोपींवर विरार पोलीस ठाण्यात ७ तर माणिकपूर पोलीस ठाण्यात १ गुन्ह्याची नोंद आहे. या कारवाईत विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे व पोलीस निरीक्षक विवेक सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक संदेश राणे, स.फौ .राजेश वाघ, पो.हवालदार सचिन लोखंडे, पो.न. सचिन घेरे, विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भूषण वाघमारे, पो.शी. इंद्रनील पाटील, विशाल लोहार, सुमित जाधव, रवी वानखेडे, सुनील पाटील यांनी भाग घेतला.

### यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालयाचे...

घालून कराड परिवाराने काम केले आहे. विलासराव देशमुख आणि वि. दा. कराड सरांनी ज्याप्रमाणे संत परिषद घेवून यशस्वी केली त्याप्रमाणे राहूल कराड तुम्हीही एखादा लोकोपयोगी उपक्रम हाती घ्या आपण यशस्वी करूया असे सांगून लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी राजकीय द्वेष न बाळगता सर्वांनी मिळून जिल्ह्याला पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कोरोनाच्या संकट काळात यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालयात आरोग्य अधिका-यांची बैठक घेवून कोरोना रूग्णांच्या हितासाठी निर्णय घ्यावेत अशी सुचना आ. रमेशअप्पा कराड यांना यावेळी ना. अमित देशमुख यांनी केली. महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल करण्याच्या दिशेने राज्य शासन सकारात्मक आहे. संविधान आणि गुणवत्ता हे दोन्ही सर्वोच्च असल्याने दोन्हीचे सुत्र बाळगून वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात दमदार पाऊल टाकणार असल्याचे सांगून ना. देशमुख म्हणाले की, राज्य शासनाने वैद्यकीय प्रवेश विभागीय आरक्षणाची प्रक्रिया रद्द करून सर्व विभागांना एकच व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. येत्या काळात लातूर शैक्षणिक केंद्र निर्माण होण्यात कसलीच अडचण येणार नाही. राज्यात जिल्हयात कोरोनाचा प्रार्दुभाव वाढतच चाललेला आहे. यास प्रत्येकाने न घाबरता दक्षता बाळगावी लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात कोरोना रुग्णांसाठी चारशे बेडच्या स्वतंत्र कक्षासह कोरोना रुग्णांसाठी असलेल्या स्वतंत्र कक्षात १४० ऑक्सिजन बेडची सोय करण्यात आली आहे. या बाबत ना. अमित देशमुख यांनी समाधान व्यक्त करून कोरोना रूग्णांच्या हितासाठी राहूल कराड, रमेशअप्पा कराड यांच्या सोबत मी आहे असे बोलून दाखविले. यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी पुणे संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष राहुल कराड म्हणाले की, विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने आणि सहकार्यानेच हे महाविद्यालय उभे राहिले असून आजच्या प्रसंगी त्यांची ऋण व्यक्त करणे गरजेचे आहे. योगायोगाने आज वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून अमितजी देशमुख यांनी एमआयटी परिसराला भेट दिली याचा मनस्वी आनंद आहे. कोरोनाच्या या आपत्तीमध्ये शासन व प्रशासनाला पूर्ण सहकार्य देऊन कोरोना रुग्णांवर यशवंतराव चव्हाण रूग्णालयात दर्जेदार उपचार करण्यात येतील अशी ग्वाही त्यांनी दिली. भविष्यात येणाऱ्या संकटावर मात करण्यासाठी वैद्यकीय शिक्षणाकडे अधिक लक्ष देऊन या क्षेत्रात नवीन काय करता येईल यासाठी अधिकचे प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा राहुल कराड यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, डॉ. एस एस पाटील डॉ. हबुसिंग जाधव डॉ. विद्या कांदे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख डॉक्टर्स, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. सरीता मंत्री यांनी तर आभार डॉ.बी.एस.नागोबा यांनी मानले.

21 TO 27 SEPTEMBER 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 19/09/2020 6:56 PM Page 1



# पत्रकारांचा विमा उतरवून बळी गेलेल्यांच्या कुटुंबियांना ५० लाखांच्या मदतीची मागणी

**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्रात कोरोनाचं संकट अधिक उग्र आणि व्यापक झालेलं आहे. आजपर्यंत ५०० पेक्षा जास्त पत्रकारांना कोरोनाची लागण झालेली आहे. ५०च्या जवळपास पत्रकारांवर विविध रूग्णालयात उपचार सुरू आहेत आणि कोरोनानं २५ च्यावर पत्रकारांचे बळी गेले आहेत. त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य मिळावे व इतर पत्रकारांचा विमा उतरवून घ्यावा यासाठी एक निवेदन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना वाड्याचे तहसीलदार यांच्या मार्फत वाडा तालुका पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवारी देण्यात आले. आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी बुलढाणा येथील एका कार्यक्रमात बोलताना पत्रकार हे कोरोना



यौध्दे असून कोरोनामुळे पत्रकाराचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबियांना ५० लाख रूपयांची मदत करण्याची घोषणा केली होती. मात्र कोरोनानं २५ पत्रकारांचे बळी गेल्यानंतर देखील एकाही पत्रकाराच्या नातेवाईकांना सरकारकडून मदत मिळाली नाही. सरकारने घोषणा केल्या प्रमाणे दिवंगत पत्रकारांच्या कुटुंबियांना तातडीने ५० लाख रूपयांची आर्थिक मदत मिळावी. पुणे येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी पत्रकार परिषदेत पत्रकारांना विमा योजनेचे कवच दिले जाईल आणि त्याबाबतचा निर्णय पुढील कॅबिनेटमध्ये घेतला जाईल असे स्पष्ट केले होते. या गोष्टीलाही पंधरा दिवस झाले पण विम्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. तो तातडीने व्हावा अशी विनंती निवेदनातून केली आहे. या प्रसंगी वाडा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष जयेश शेलार, उपाध्यक्ष दिनेश यादव, सचिव रुपेश मोकाशी, कार्याध्यक्ष वैभव पालवे, मच्छिन्द्र आगीवले, सचिन भोईर, शशिकांत कासार, सल्लागार रमेश पाटील संपर्क प्रमुख व प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे कोकण विभाग संघटक संजय लांडगे उपस्थित होते.

# औसा नगर पालीकेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अलीशेर कुरेशी



**औसा/प्रतिनिधी**

औसा नगर पालीकेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी घेण्यात आलेल्या विशेष सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अलीशेर कुरेशी यांची उपनगराध्यक्षपदी निवड करण्यात आली. औसा नगर पालीकेचे नगराध्यक्षा डॉ अफसर शेख तथा पीठासीन अधिकारी यांनी पालीकेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी व स्वीकृत सदस्य निवडी करिता वीडियो कॉन्फ्रेंसिंग द्वारे विशेष सभा बोलावली होती. या वेळी २० सदस्यां पैकी १६ सदस्य या बैठकिला उपस्थित होते. या वेळी राष्ट्रवादीचे अलीशेर कुरेशी यांची उपनगराध्यक्ष तर राष्ट्रवादीच्या रिक्त स्वीकृत सदस्य पदासाठी भावसार समाजाचे तरुण रूपेश दुधनकर यांची निवड करण्यात आली. कोरोनाच्या पार्श्वभुमिवर न. प. ने वीडियो कांनफ्रेरसिंगच्या सहाय्याने ही निवड पार पडली. या मुळे न प चा एक वेगळा ठसा उमटला गेला आहे. या विशेष सभेस नगराध्यक्ष डॉ.अफसर शेख, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, न. प. सदस्य अलीशेर कुरेशी, माजी नगराध्यक्ष जावेद, स्वच्छता व आरोग्य सभापति मुजाहेद शेख, शेख, परवीन शेख, मेहराज शेख, पा पु सभापति गोविंद जाधव, रूमा काझी, कीर्ति कांबळे, नजमुनबी इनामदार, जहाँआरा तत्तापुरे, आंगद कांबळे, मंजुषा हजारे, सुनील उटगे, उनमेंश वागदरे, सुहास डेंग यांच्यासह सभा अधीक्षक महेमुद् शेख उपस्थित होते.

# वाड्यातील अबिटघर येथील अपघातग्रस्त तरुणाचा मृत्यू

**वाडा/प्रतिनिधी**



अबिटघर येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास झालेल्या अपघातातील तरुणाचा सायन येथील रुग्णालयात उपचारादारम्यान बुधवार दि.१६ सप्टेंबर रोजी दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वाड्यातील पीक कॉलनी (मुळगाव मानिवली, ता.वाडा) येथे राहणारा मयूर मधुकर पाटील (२८) याचे शहापूर येथे मोबाईल विक्रीचे दुकान असून तो रोज आपल्या कारने ये -जा करत असे. शुक्रवारीही तो नेहमी प्रमाणे दुकान बंद करून वाड्याच्या दिशेने येत असताना अबिटघर येथे आला असता त्याचे कार वरील नियंत्रण सुटल्याने गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन आदळली, यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती, त्यातच रात्री उशिरा अपघात झाल्याने त्याला तातडीने मदत मिळाली नाही. व जवळच्या रुग्णालयातही त्याला कोणी दाखल करून घेतले नाही, त्याला ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये दाखल केले व तेथून सायन रुग्णालयात हलविण्यात आले मात्र तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. लग्न होऊन एक वर्षही झाले नसलेल्या, मेहनती व कर्तृत्ववान मयुरच्या अकाली निधनाने सर्वत्र दुःख व्यक्त केले जात आहे.

# एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीने राष्ट्रीय माध्यम व पत्रकारिता परिषदेचे आयोजन

**पुणे/प्रतिनिधी**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे तर्फे सोमवार, दि.२१ ते गुरूवार दि. २४ सप्टेंबर २० या कालावधीत चार दिवसीय ऑनलाईन, दुसरी राष्ट्रीय माध्यम व पत्रकारिता परिषद आयोजित करण्यात आली आहे. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका हा या परिषदेचा मुख्य विषय आहे. या परिषदेचा उद्घाटन समारंभ सोमवार, दि. २१ सप्टेबर २०२० रोजी सकाळी ११.०० वा. होणार आहे. या समारंभासाठी द हिंदू पब्लिसिंग ग्रूपचे संचालक आणि ज्येष्ठ पत्रकार पद्मभूषण डॉ. एन.राम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रहातील. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय संबधांचे माजी प्रा. पद्मश्री डॉ. पुष्पेष पंथ, टिव्ही ब्रॉड कास्टरचे संपादक आणि राजकीय विश्र्लेषक पद्मश्री आलोक मेहता, राजकीय विश्र्लेषक संजय बारू आणि नई दुनिया चे माजी प्रमुख संपादक श्रवण गर्ग हे सन्मानीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच, परिषदेचा समारोप संमारंभ गुरूवार दि. २४ सप्टेंबर २०२० रोजी सायं. ५.३० वा. होणार आहे. अरूणाचल प्रदेशचे माजी राज्यपाल व सुप्रसिद्ध लेखक श्री.तथागत रॉय हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ पत्रकार श्री.आशितोष, लोकसभेचे खासदार भत्रीहरी महताब, विवेकांनद इंटरनेशनल फाउंडेशनचे अध्यक्ष आणि तुघलकचे संपादक स्वामिनाथन गुरूमुर्ती, ले. जनरल अरविंदर सिंग लाम्बा (पीव्हीएसएम, व्हीएसएम) हे सन्माननीय पाहुण म्हणून उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र-कुलगुरू प्रा.डॉ.आर.एम,चिटणीस यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी स्कूल ऑफ मीडिया अ‍ॅण्ड जर्नालिझमचे प्रमुख डॉ. कंवलजीत सिंग आणि प्रा. अनुराग वर्मा हे उपस्थित होते.या चार दिवसीय प्रसारमाध्यम व पत्रकार परिषदेत नऊ सत्र होणार आहेत. मीडिया आणि मनोरंजन उद्योगः आव्हाने पोस्ट कोविड १९, डिजिटल युगातील प्रसारण माध्यमांचे भविष्य, मानवी हक्कांच्या दृष्टिकोनातून पत्रकारिता, आंतरराष्ट्रीय एक जागतिक शक्ती म्हणून उद्यासः आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन, फेक न्यूजः सत्यता निराकरणसाठी आधार काय, कम्युनिटी रेडिओ इन इंडियाः काल, आज आणि काल, राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी माध्यमांची भूमिका, सार्वजनिक कल्याणासाठी माध्यमाच्या संप्रेषणाचे माध्यम म्हणून रेडिओची प्रासंगिकता, मीडिया मालकांपुढील आव्हाने आणि भावी दिशा या व्यतिरिक्त दोन ' मीडिया टू मीडिया कनेक्ट' व दोन ' यूथ टू यूथ' असे सत्र होणार आहेत. महाराष्ट्रातील व देशाच्या विविध राज्यातील प्रतिष्ठित माध्यम समूहांचे मान्यवर प्रमुख सिध्दहस्त संपादक, ख्यातनाम पत्रकार संस्थांचे प्रमुख पदाधिकारी, विविध माध्यमातील अनुभवी पत्रकार या परिषदेत सहभागी होणार असून मुख्य विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन व विचारविनिमिय करतील.यामध्ये पराग करंदीकर, संपादक, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, प्रोफेसर अमिताभ श्रीवास्तव, जयपूरच्या मनिपाल युनिव्हर्सिटीचे संचालक आणि मीडिया पर्सन, असित कुमार मोदी, निर्माता, टीव्ही शो तारक मेहता का उल्टा चष्मा आणि स्वच्छ भारत राजदूत, मुंबई, ऑस्ट्रेलिया राष्ट्रीय विद्यापीठाच्या नॅशनल सिक्युरिटी कॉलेजचे प्रमुख, रोरी मेडकॅल्फ, सुशील कुमार शर्मा, ज्येष्ठ पत्रकार आणि शिक्षणतज्ज्ञ, नवी दिल्ली, प्रा.अंग संग नियान, व्याख्याता, कला, डिझाइन आणि मीडिया स्कूल, नानयांग टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूर, रत्नेश पाठक वरिष्ठ निर्माता, एबीपी न्यूज, दिल्ली, अनुराग पुनेठा, ज्येष्ठ अँकर, लोकसभा टीव्ही, दिल्ली, हितेश शंकर, संपादक, पंचजन्य, दिल्ली, दिनेश गौतम, वरिष्ठ अँकर, टीव्ही ९, दिल्ली, सुधीर सहस्रनाम, ज्येष्ठ पत्रकार, हैदराबाद, प्रो. लुकास एमएफव्ही जडग्ने, वरिष्ठ व्याख्याता, स्कूल ऑफ आर्ट, डिझाइन आणि मीडिया, नानयांग टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूर, गोपाल शर्मा, संपादक, आप की क्रांती, नवी दिल्ली, रितेश लाखी. मुख्य संपादक, ग्लोबल पंजाब टीव्ही, पंजाब, हरीश पराशर, सहाय्यक संपादक, राजस्थान पत्रिका, राजस्थान, शुनाशीर सेन, संपादक, मिड-डे, मुंबई, जयंत माईनकर, ब्युरो चीफ, यूएनआय, मुंबई, प्रा. अविनाश सिंह, दिग्गज पत्रकार, माजी प्रधान प्रतिनिधी, हिंदुस्तान टाईम्स, नवी दिल्ली, सतीश जेकब, माजी भारतीय चीफ ब्यूरो, बीबीसी, नवी दिल्ली, दिनेश कुमार, वरिष्ठ पत्रकार, चंदिगड, जगतरसिंग, ज्येष्ठ पत्रकार व लेखक, चंडीगड, श्रीमती उमा सुधीर, निवासी संपादक, एनडीटीव्ही, हैदराबाद, प्रोफेसर मे ऑलविन, प्राध्यापक, नानयांग टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूर, एस. वेंकट नारायण, अध्यक्ष, फॉरेन कॉरेस्पॉडेन्टिव्ह क्लब ऑफ दक्षिण एशिया, दिल्ली, डॉ. ग्लेन फुलर, असोसिएट प्रोफेसर, न्यूज अ‍ॅण्ड मीडिया रिसर्च, ऑस्ट्रेलिया, पीआयओ टीव्ही प्रा. चे अध्यक्ष मुनीष गुप्ता. लि. चेअरमन, पीआयओ सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, अध्यक्ष, मीडियामंत्र, इन्क. सिमरन सोढी, स्तंभलेखक, दिल्ली, डॉ. वायल आववाड, ज्येष्ठ पत्रकार, दिल्ली, व्हिक्टोरिया हमाह, कार्यकारी संचालक, पोवा, घानामार्गांक्स सॉलिनास, पत्रकार, फ्रान्स, श्रध्दानंद सिताल, अध्यक्ष, ग्लोबल ह्यूमन राइट्स डिफेन्स, नेदरलँड्स, यशोधन आगळगावकर, बाल हक्क चळवळ, यूएसए डॉ. पॉल काटूस, एज्युकेशन प्रोफेशनल, युईए, डॉ. मनीष जैसल, चित्रपट समालोचक, लखनऊ, रणजित कपूर, संचालक, अभिनेता आणि पटकथा लेखक, अजित राय, चित्रपट समालोचक, कमल शर्मा, वरिष्ठ उद्घोषक, विविध भारती, ऑल इंडिया रेडिओ, मुंबई, अनिल चौबे, चित्रपट समालोचक, मध्य प्रदेश, डॉ. कांचन मलिक, प्राध्यापक, संचार अभ्यास विभाग, हैदराबाद विद्यापीठ, हैदराबाद, पूजा मुराडा, अल्फाज-ए-मेवात, हरियाणा, फ्र बिजो थॉमस रेडिओ मटोली - केरळ, राधा शुक्ला वक्त की आवाज - यूपी सिस्टर कृष्णा, रेडिओ मधुबन - राजस्थान, ओंकारेश्वर पांडे, अनूप के. मुदगल, मेजर जनरल दिलवर सिंग, डॉ. सतिश मिश्रा, कर्नल जयबॉन सिंग, संजय सिंग, नरिसअली, हयुमायून कासेरा, सुजेय ठाकूर, श्वेता, तरूण जोशी, श्याम शेख, अभिषेक कुलकर्णी, उर्बने लक्झरी वेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबईचे संचालक, विजय दर्डा, लोकमत मीडिया ग्रुप, नवी दिल्ली चे अध्यक्ष, रॉन रॉय नाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, द फिल्मी मोनक्स, मुंबई, सुश्री श्वेता पोवार, डायरेक्टर, एरिया कम्युनिकेशन्स यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या संदर्भात लिबरल आर्ट, फाइन ऑर्ट, मीडिया अ‍ॅण्ड जर्नालिझम स्कूलच्या अधिष्ठाता प्रा.डॉ. अनुराधा पराशर यांनी सांगितले की, देशातील पत्रकार व पत्रकारितेतील विद्यार्थी या राष्ट्रीय परिषदेत सहभागी होतील. ही राष्ट्रीय परिषद जास्तीत जास्त यशस्वी होण्यासाठी माध्यम व पत्रकारितेतील जाणकार व्यक्तींनी आपला मौलिक सहभाग नोंदवून ह्या राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनाचा विधायक उद्देश सफल करावा असे आवाहन प्रमुख संयोजकांनी केले आहे.ही ऑनलाईन परिषद www.mitwpu-ncmj.com या संकेतस्थळावर होणार आहे.

# आटगावजवळ लोकलचा डबा घसरला; आसनगाव ते कसारा वाहतूक ठप्प

ठाणे: आटगाव रेल्वे स्टेशनजवळ आज सकाळी लोकलचा डबा रेल्वे रुळावरून घसरल्याने आसनगाव ते कसारा दरम्यानची लोकल वाहतूक ठप्प झाली आहे. करोनामुळे आधीच लोकलच्या फेऱ्या कमी असताना त्यातच लोकलची वाहतूकही ठप्प झाल्याने मुंबईकडे येणाऱ्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल होत आहेत. आज सकाळी ७ वाजून २८ मिनिटाच्या सुमारास मध्य रेल्वेच्या आटगाव स्टेशन जवळ लोकलचा डबा रुळावरून घसरला. ही लोकल आटगावकडे येत होती. लोकलचा डबा रेल्वे रुळावर आल्याने आसनगाव ते कसारा वाहतूक ठप्प झाली आहे. या लोकलच्या डब्यात ८ ते ९ प्रवासी होते. या दुर्घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याचा मध्य रेल्वेने दावा केला आहे. या अपघाताची माहिती मिळताच मध्य रेल्वेच्या कर्मचारी-अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन लोकलचा डबा रेल्वे रुळावरून दूर करण्याचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत. तसेच प्रवाशांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असं आवाहन मध्य रेल्वेने केलं आहे. दरम्यान, करोनाचा संसर्ग वाढू नये म्हणून सर्वसामान्यांना लोकलमधून प्रवासास बंदी करण्यात आली आहे. अत्यावश्यक सेवेतील कामगारांनाच रेल्वेतून प्रवासास मुभा देण्यात आली आहे. अत्यंत कमी प्रमाणात लोकांना प्रवासाची मुभा देण्यात आल्याने लोकलच्या फेऱ्याही मर्यादित प्रमाणात चालवण्यात येत आहेत. त्यामुळे लोकल, बस आणि एसटीमध्ये नागरिकांची तुफान गर्दी असते. आता कसारा ते आसनगाव दरम्यानची वाहतूक बंद पडल्याने मुंबईला कामासाठी येणाऱ्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले आहेत. अनेक चाकरमान्यांनी मुंबईला जाण्यासाठी थेट एसटी आगार गाठल्याने एसटीतही प्रवाशांची प्रचंड गर्दी वाढली आहे.

# नाथाभाऊंसोबत कुणाकुणाला फडणविसांचे घर जाळायचे आहे?

खान्देशचे एकनाथराव खडसे यांनी सन १९९५ च्या सेना भाजपा युती सरकारमधे पाटबंधारे मंत्रीपद भुषवले. त्यानंतर सन २०१४ मधे मुख्यमंत्रीपदाची महत्वाकांक्षा जाहीर करुन बसले. त्यांची ती संधी हुकली. दिल्लीच्या भाजपा श्रेष्ठींनी मुख्यमंत्रीपदाची माळ देवेंद्र फडणविस यांच्या गळ्यात पडली. हा निर्णय येईपर्यत राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री कोण होणार? यावर चॅनल्सवर गाजलेल्या अनेकांची नावे लॉबींग झाली. त्यावेळी याच पदासाठी चर्चेतील एक नाव विनोद तावडे यांचे होते. मुख्यमंत्री कुठलाही करा पण तो तोडीपाणी वाला नसावा असे विनोद तावडे यांनी अँकरच्या एका प्रश्नाला दिलेल्या उत्तरात म्हटले होते. त्या उत्तराची क्लिप मुलाखत एका चॅनलवर वारंवार चालवण्यात आली होती. मुख्यमंत्री कोण असावा यापेक्षा तो कसा नसावा? हा एक सुचक इशारा होता. ते देखील स्पर्धेतील इच्छुक होतेच.

दिल्लीच्या पक्षश्रेष्ठींनी मुख्यमंत्रीपदासाठी हार्ड रॉक (कठीण खडक) एवजी सॉफ्ट फडणविसांची निवड केली. त्यानंतर नाथाभाऊंना बारा खात्याचा पदभार दिला गेला. त्यापुढील वाटचालीत त्यांचे मंत्रीपद गेले. तत्पुर्वी भोसरीचे जमीन खरेदी प्रकरण गाजले. प्रचंड बेनामी संपत्तीचे आरोप झाले. खडसेंनी पुरावे मागीतले. दमानीया तोफ धडाडली. क्लिन चिटचा डाव रंगला. मधल्या काळात मुख्यमंत्री फडणविसांवर जळगावच्या सुभाष चौकातील सभेत खडसे यांनी सुपारीबाज अशा शब्दात हल्ला



चढवला. आपले मंत्रीपद घालवणा-या भजपातल्या त्या मंत्र्याला जनतेसमोर खेचून आणू म्हणून गर्जना झाल्या. जिल्ह्यात भाजपाचे दुसरे सत्ता केंद्र म्हणून उदयास आलेले नंतर मुख्यमंत्र्यांचे संकट मोचक म्हणून ओळखले गेलेले गिरीषभाऊ महाजन यांच्या दिशेने अंगुली निर्देश करत इशारेबाजी झाली. या पार्श्वभुमीवर राज्यात भाजपा सत्तेची पाच वर्षाची सलग टर्म पुर्ण करणारे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यशस्वी झाले. सत्तेतील भागीदार शिवसेने सोबतची त्यांची रोजची भांडणे महाराष्ट्राने पाहिली. अलिकडे सन २०१९ च्या विधानसभा निवडणूकीत एकनाथराव खडसे यांचे तिकिट कापून त्यांच्या सुकन्येला देण्यात आले. त्या गदारोळात नाथाभाऊंवर अन्याय करणारा पक्ष म्हणून भाजपालाही धडा शिकवण्याची भाषा झाली. हा म्हणे कार्यकर्त्यांचा संताप. सत्तेच्या समुद्रात पट्टीच्या पोहणा-याला माशाप्रमाणे जलाशयातून जमीनीवर आणून टाकल्याने नाथाभाऊंनी जमेल त्या व्यासपीठावरुन त्यांच्यावरील अन्यायाचा नगारा बडवला. सोबत प्रिंट आणी इलेक्ट्रॉनिक मिडीयाची फौज दिमतीला होतीच. इतकी की एका आघाडीच्या दैनिकाची कोथळी आवृत्ती सुरु झाल्याचा भास व्हावा इतकी सेवा रुजू झाली.

अलिकडे नाथाभाऊंचा वाढदिवस निमीत्ताच्या कार्यक्रमात पुन्हा एकदा नाथाभाऊ तोफ धडाडली. साडेचार वर्ष सुचक इशारे (बघून घेईन स्टाईल) झाले. यावेळी मात्र नाथाभाऊंनी जाहीरपणे देवेंद्र फडणविस यांनीच अन्याय केल्याचा, त्रास दिल्याचा जाहीर आरोप केला. ज्यांना नाड्या बांधायला शिकवले तेच आता मला देखील अक्कल शिकवायला निघालेत अशा शब्दात त्यांनी सुनावले. माजी मंत्री गिरीष महाजन यांनी मात्र नाथाभाऊ जेष्ठ मार्गदर्शक असा बहुमान देत अंग काढून घेतले. लगेच शिवसेना नेते पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नाथाभाऊ यांना फडणविसांशी कुस्ती खेळण्याचा सल्ला दिला. ही कुस्ती म्हणजे मांडवली कुस्ती नसावी असा इशारा देखील गुलाबराव पाटील यांनी त्यावेळी दिला.

काही वर्षापुर्वी मुक्ताईनगर हे चंबळखोरे तर पाळधी बिहार बनल्याचा आरोप करणाऱ्या खडसे - गुलाबरावांचे मेतकुट जमल्याबद्दल अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. गेल्या पाच वर्षात गिरीष भाऊंनी नाथाभाऊंचे नेतृत्व मान्य करत सलोखा करावा यासाठी काही इव्हेंट मॅनेजर्स मॅनेजर्सनी प्रायोजीत कार्यक्रम राबवले होतेच.

आताशा आक्रमक नाथाभाऊंनी फडणविसांवर जाहीर आरोप केले. शिवाय भाजपाच्या माजी मंत्र्यांच्या पी.ए.च्या अश्लील क्लिप्स आपल्याकडे आहेत याबाबत हवे तर जामनेर भागातील लोढा यांना विचारा असा संदर्भ देत नाथाभाऊ जिल्ह्यात कुणाची शिकार करु पाहतात याची चर्चा सुरु झाली आहे. या लोकसभा निवडणूकीच्या धामधुमी पुर्वीच भाजपाचे माजी खासदार ए.टी.नाना पाटील यांचे तिकीट कापण्यासाठी अशाच एका अश्लील क्लिपचा वापर करण्यात आला. त्यांचे राजकीय करीअर संपवण्यात आले. त्यांचा अशा प्रकारे पत्ता कापण्याचा उद्योग कुणी कुणाच्या सहकार्याने केला याची जिल्ह्यात अनेकांना माहिती असली तरी योग्य वेळी राजकीय पतंग कापण्याचा डाव टाकला जातो. यात भरीस भर म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची नाथाभाऊंच्या वाढदिवसाला हजेरी होती. खडसे सारख्यांच्या योगदानामुळे पक्षाला अच्छे दिन आले असे प्रमाणपत्र बहाल करणारे नितीनभाऊ हे देखील नागपुरचेच. फडणविसांना आव्हान देवू पहात असतांना गडकरीजींनी नाथाभाऊंना उत्तम कार्याचा दाखला का देत सुटावे? असा प्रश्न सामान्यांना पडतो.

राज्याच्या राजकारणात सुमारे ४५ आमदारांचा एक गट गडकरी समर्थक असल्याचे पद्धतशीररित्या सांगितले जाते. नितीन गडकरी राष्ट्रीय राजकारणात आहेत. त्यांची सध्या दिल्लीत कुणालाच अडचण वाटत नसल्याने ते तिथे आरामात असावे. काही वर्षापुर्वी भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची सुत्रे त्यांच्या हाती जावू पाहताच गडकरींच्या औद्योगीक क्षेत्रातील नामी बेनामी सांपतीक स्थिती बाबत आरोपांची मालिका वृत्तपत्रातून गाजली. भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष ते पंतप्रधानपदाचा संभाव्य उमेदवार असा त्यांचा विचार कुणी करु नये म्हणून वरील डावपेच होते असे म्हणतात.

याबाबत स्वत: गडकरी यांनीच आपणास कोणत्याही मोठ्या पदाची अपेक्षा नसल्याचे स्वत:च स्पष्टीकरण दिले. शिवाय काही समारंभात त्यांना भोवळ आल्याची दृष्ये चॅनल्सवर वारंवार दिसली. काही वर्षापुर्वी महाराष्ट्रात भाजपाच्या नेतेपदी फडणवीस की गडकरी? फडणवीस पाच वर्ष पुर्ण करणार की गडकरींना आणणार? अशा चर्चा सोडण्यात आल्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद हे बहुसंख्य राजकीय नेत्यांचे स्वप्न असते. पक्षश्रेष्ठींची मर्जी संपादन करुन ते साकारत असतांना केव्हा केव्हा ते पद दुस-याला मिळू नये असे डावपेच होतात. राज्यात भाजपा सध्या विरोधात आहे. विरोधी पक्षनेते पदी पुन्हा फडणवीस आहेत. महाविकास आघाडीचे शिंकाळ तुटण्याची राजकारण्यांना प्रतिक्षा आहे. तसे झालेच तर आपली जागा आजच रिझर्व्ह करण्यासाठी काहींचा आटापिटा आहे. फडणविसांचे घर जाळण्याच्या उपक्रमात भाजपाचेही घर जाळण्याची ही तयारी म्हणायची का? शिवसेनेसह रा.कॉ. - काँग्रेसला भाजपात तोडफोड हवीच. नाथाभाऊंना हवा देवून फडणवीस नेतृत्वाचे विसर्जन अनेकांना हवे असल्याचे दिसत आहे. त्यात गडकरीजींचा उद्याचा रोल काय? पंचपक्वानांच्या पंगतीतून उठवून लावलेल्या नाथाभाऊंना नेमके काय मिळणार? भाजपात करीअर थांबले? कुणी म्हणत ईडीची भिती आहेच. नाथाभाऊंचा प्रचंड संताप रेल्वे प्लॅटफॉर्मवर पोचल्यावर डोळ्यासमोरुन ट्रेन निघून गेल्यावर एखाद्या प्रवाशाला येणाऱ्या संतापाप्रमाणे दिसतो.

साप्ताहिक गुन्हेगारीचा कर्दनकाळ क्राईम संध्या

# यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाचे कोरोना कक्ष लातूरकरांसाठी आशेचा किरण - पालकमंत्री देशमुख



लातूर/प्रतिनिधी

राज्यात सर्वत्र कोरोना आजाराने थैमान घातले असून दिवसेंदिवस लातूर जिल्हयात रूग्णांची संख्या वाढत आहे या परिस्थितीत लातूरच्या यशवंतराव ग्रामीण रूग्णालयात कोरोना बाधीत रूग्णांना अद्यावत सुविधा देवून दिलासा देण्याचे काम होत आहे. कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी मोलाचे योगदान देणारे हे केंद्र लातूरकरांसाठी आशेचा किरण ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्हयाचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी केले.

लातूर येथील एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुणालयात कोरोना रुग्णांसाठी कार्यरत असलेल्या चारशे बेडच्या स्वतंत्र कक्षाचे उद्घाटन पालकमंत्री देशमुख यांच्या हस्ते गुरूवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास राज्याचे पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री संजय बनसोडे, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी पुणे संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष राहुल कराड, लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड, लातूर महानगरपालिकचे महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, महानगरपालिका आयुक्त देवीदास टेकाळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय ढगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, एमआयटीचे सहकार्यकारी संचालक डॉ.हणुमंत कराड, उपअधिष्ठता डॉ.बी.एस.नागोबा, शैक्षणिक व प्रशासकीय संचालक डॉ. सरिता मंत्री, रूग्णालय अधिक्षक डॉ. एच. एच. जाधव, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य एस एस सर्वानन, फिजोथेरपीच्या डॉ. स्वाती जाधव, कोरोना विभाग प्रमुख डॉ. गजानन गोंधळी, डॉ. विशाल भालेराव, कोर कमिटीचे प्रमुख डॉ. अरुणकुमार राव उपस्थित होते. लातूरच्या एमआयटी परिसरात आल्यानंतर मनस्वी आनंद होतोय, आतापर्यंत केवळ ऐकून होतो आज पाहण्याचा योग आला. एमआयटीचे सर्वेसर्वा आदरणीय वि. दा. कराड सरांनी अत्यंत मेहनतीने हे सर्व उभे केले आहे. असे सांगून ना. देशमुख म्हणाले की या परिसरातील स्वच्छता, निटनेटकेपणा, वृक्षलागवड हे सगळे पाहिल्यास आपण लातूरात आहोत की कुठे आहोत हा प्रश्न पडावा असं सौंदर्य आहे. इथल्या इमारती पाहिल्यानंतर रोम मेध्ये आल्याची जाणीव होते.वि. दा. कराड सरांचे कार्य तपश्र्चर्या त्याग सचोटी असे विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे विलासरावजी देशमुख आणि कराड सरांचे ऋणानुबंध संबंध सर्वांना माहीत आहेत. पुढच्या पिढीत तसाच संवाद, सदभाव असावा जसा पूर्वी होता. मध्यंतरी संवाद झाला नसला तरी पुर्वीप्रमाणे तसेच जिव्हाळयाचे संबंध निर्माण होतील यात शंका नाही मी आणि राहुल आज पासून या नव्या पर्वाला सुरुवात करत आहोत असेही ना. अमित देशमुख यांनी बोलून दाखविले.लातूरच्या मातीचा सन्मान, बहुमान वाढविणा-या व्यक्तीबद्दल विलासराव देशमुख यांच्या मनात काय भावना होत्या त्या मी शब्दात व्यक्त करू शकत नाही असे सांगून कराड सरांच्या विचारांचा वारसा राहुल कराड पुढे घेवून जात आहेत याचा सार्थ अभिमान आहे निश्र्चितपणे ते लातूरच्या मातीचा गौरव जगाच्या पाठीवर करतील याची मला खात्री आहे असे ना. अमित देशमुख यांनी गौरवद्गार काढले. सतत विज्ञान आणि अध्यात्माची सांगड ...पान ६ वर

# बँक खाजगीकरणास कर्मचाऱ्यांचा विरोध



अहमदपूर/फिरोज शेख

केंद्र सरकार सध्या देशातील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेसह इतर सरकारी बँकांचे खाजगीकरण करण्याची तयारी करत आहे. केंद्र सरकारच्या या धोरणा विरोधात ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लाइज फेडरेशन व बँक ऑफ महाराष्ट्र ऑफीसर्स असोसिएशन कर्मचारी संघटनेच्या वतीने अहमदपूर शाखेत विरोध दर्शवुन शपथ घेण्यात आली. यावेळी अहमदपूर, हाडोळती, काजळ हिप्परगा येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

केंद्र सरकार सध्या देशातील अनेक सरकारी बँकांचे खाजगीकरण करण्याची तयारी करत आहे. केंद्र सरकारच्या या योजनेनुसार पावले उचलली गेलीत तर पुढच्या काळात देशात फक्त पाच सरकारी बँका उरतील. सरकार तसेच देशातील बँकिंग सेक्टरमधील सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार बँकिंग इंडस्ट्रीची परिस्थिती सुधारण्यासाठी खाजगीकरणाचा निर्णय घेतला जात आहे. यासाठी सरकार पहिल्या टप्प्यात बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, युको बँक,आणि पंजाब अँड सिंध बँकेतील भागिदारी विकणार आहेत असे वातावरण तयार केले जात आहे . सध्या देशात सरकारी बँकांची संख्या एकूण १२ इतकी उरली असून हीच संख्या २०१७ मध्ये २७ इतकी होती.

बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेची १९३५ साली स्थापना झाली आज या बँकेला ८५ वर्ष पूर्ण झाले असुन केंद्र सरकार राष्ट्रीयकृत बँकांचे खासगीकण करण्याचा डाव आखत असल्यामुळे त्याला विरोध म्हणून राष्ट्रीयकृत बँकेच्या रक्षणाची व खाजगीकरणाच्या विरोधात जनजागृती करण्याची शपथ घेण्यात आली. तसेच बँक खाजगी करणाच्या विरोधात नागरीक, विद्यार्थी, कर्मचारी व सर्वसामान्य जनतेच्या स्वाक्षऱ्या घेवून केंद्र सरकार विरोधी मोहीमेला सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी माजी बँक व्यवस्थापक हनमंत माटे, रोखपाल राम परिठ अहमदपूर, रोखपाल शिवाजी कोळी हाडोळती, रोखपाल वाल्मीक कज्जेवाड काजळ हिप्परगा, भास्कर केंद्रे, अश्विनी गुरमे, कृष्णा नखाते, धर्मेश बनसोडे, युसुफ काझी, ज्ञानोबा जाधव, दिलीप वाघमारे, बापूराव भगत, हरिश्चंद्र जाधव, सतीश बनसोडे, व्यंकट भोगे, सुभाष काळींग्रे, मनोज वाघमारे, चैतन्य कोटा आदीं बँक कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी

## पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

लातूर/प्रतिनिधी

लातुर जिल्ह्यात सुरु असलेल्या पावसामुळे अतिवृष्टी होऊन खरिपाच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला आहे. यामुळे खरिपाचे संपूर्ण पीक हातातून गेलेले आहे. या झालेल्या नुकसानीचे ताबडतोब पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रमेश लोंढे यांनी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख आणि जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जी श्रीकांत यांच्याकडे केली आहे. शेतकऱ्यांच खरीपानं भरलेलं ताट, निसर्गाने सोयाबीनची तर लावली वाट. अशी विचित्र अवस्था निर्माण झालेली आहे. आणि अशा परिस्थितीत पालकमंत्र्यांनी फिरवली नुकसान पाहणी दौऱ्याकडे पाठ, आणि कलेक्टरशी आहे आता शेतकऱ्यांची गाठ. ही स्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचं झालेला आहे फार मोठे नुकसान, त्यांच्या शरीरातलेही गळून गेले अवसान. असा विचित्र प्रसंग बळीराजा पुढे निर्माण झाला आहे. मायबाप सरकारने सोयाबीनचे द्यावे अनुदान, नाही तर शेतकरी जातीच संपेल खानदान. एवढा वाईट प्रसंग शेतकऱ्यांच्या जीवना समोर उभा राहिलेला आहे असे प्रतिपादन या निवेदनात रमेश लोंढे यांनी मांडले आहे.



सततच्या पावसाने औसा तालुक्यातील सोयाबीन व इतर पिकांची अवस्था तर अत्यंत वाईट आहे. परिपक्व अवस्थेत असलेल्या सोयाबिनच्या हिरव्या शेंगाला उभ्याने मोडं फुटले आहेत. पूर्ण औसा तालुक्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्याने झालेल्या पावसाच्या नोंदीवरून अतिवृष्टीच झाली आहे. संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांचा आणि निसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देऊन झालेल्या या संपूर्ण नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसान भरपाईचे अनुदान देण्याची व्यवस्था करावी अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे व लोकप्रतिनिधी यांनी करावी.

# भूकंपग्रस्त भागात भूकंपरोधक घरांची निर्मिती करणार- दादाजी भुसे





## पालकमंत्र्यांनी केली भूकंपग्रस्त भागाची पाहणी

पालघर/प्रतिनिधी

जिल्ह्यात डहाणू तालुक्यातील तलासरी धुंदलवाडी या भागात नियमित भूकंपाचे धक्के बसत असून भूकंपग्रस्त भागाला तातडीने मदत करण्यात येईल तसेच भूकंपाच्या तीव्रतेचा परिणाम कमी करण्यासाठी तज्ञांची मदत घेऊन त्योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील तसेच भूकंपग्रस्त भागात भूकंपरोधक घरे तयार करण्यात येतील असे प्रतिपादन कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्हयाचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले.

भूकंपग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री दादाजी भुसे यांनी पालघर जिल्ह्याचा दौरा केला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी या गावात जाऊन पालकमंत्र्यांनी भूकंप ग्रस्त घरांची पाहणी केली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. भूकंपग्रस्त भागाचा पाहणी केलेला अहवाल तात्काळ मुख्यमंत्र्यांकडे सादर करून तातडीच्या उपाययोजना तसेच कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येतील. तसेच शासनाच्या वतीने भरीव मदत केली जाईल. असेही प्रतिपादन दादाजी भुसे यांनी केले.

धुंदलवाडी येथील वेदांता हॉस्पिटल आणि रिसर्च सेन्टर येथे भेट देऊन तेथे दाखल असलेल्या कोव्हीडच्या रुग्णांची भेट घेतली. जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने तयार केलेल्या भूकंपावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना या पुस्तिकेचे विमोचन पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते करण्यात आले. माझे कुटुंब माझी जबाबदारी या मुख्यमंत्र्यांनी सुरू केलेल्या उपक्रमात सर्वांनी आपल्या गावाकडे आपले कुटुंब म्हणून पाहिले पाहिजे,व आपली जबाबदारी समजून त्याची काळजी घेतली पाहिजे. या योजनेत अधिकारी कर्मचारी यांची टीम तयार करून सदस्यांची तपासणी करून घ्यायची आहे. ही तपासणी कोव्हीड पुरती मर्यादित न राहता कुठलेही आजाराचे निदान यातून करता येणार आहे. व त्यातून सुदृढ नागरिक निर्माण करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे जास्तीत जास्त जनतेने या योजनेचा लाभ घ्यायचा आहे, असे आवाहन ही यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष भारती कामडी यांनी भूकंपामागील शास्त्रीय कारण प्रशासनाने शोधून काढले पाहिजे असे मत व्यक्त केले. तर आमदार सुनील भुसारा यांनी भूकंपग्रस्त भागात निवारा स्थळ बनवणे गरजेचे आहे. जुन्या शाळा आहेत त्यांना धक्का लागल्यास गम्भीर परिस्थिती उदभवू शकते अशी शक्यता व्यक्त केली. आमदार श्रीनिवास वणगा यांनी भविष्यात धक्का लागला तर काय उपाययोजना करण्यात याव्यात याबाबत गावकऱ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे, असे मत व्यक्त केले. यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्ष ज्योती ठाकरे, जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ, मु.का. अ.जि.प. पालघर महेंद्र वारभुवन, प्रांत अधिकारी श्रीमती मित्तल उपस्थित होते.

## शिवसेना आणि भाजपात श्रेयवादाची लढाई सुरू

# मुख्यमंत्री ऑनलाईन लोकार्पण करणार त्याअगोदरच कल्याण नाका-साईबाबा रस्त्यावरील उड्डाणपुलाचे भाजपाकडून लोकार्पण



भिवंडी/अभिजित हिरे

शहरातील वाहतुकीची वर्दळ वाढलेली असताना तत्कालीन युती सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर करून भूमिपूजन केलेल्या कल्याण नाका ते साईबाबा या रस्त्यावरील उड्डाणपूल पूर्ण झाला असताना उदघाटना वरून शिवसेना भाजप या दोन राजकीय पक्षात श्रेयवादाची लढाई सुरू झाली असून येत्या सोमवारी या उड्डाणपुलाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ऑनलाईन लोकार्पण करणार होते. मात्र असे असतानाच शनिवारी भाजपा आमदार महेश चौघुले व शहराध्यक्ष संतोष शेट्टी यांनी आपल्या कार्यकर्त्यासह उड्डाणपुलावर नारळ वाढवून लोकार्पण करीत वाहनांना झेंडा दाखवीत हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केला. श्रेयवादाच्या या लढाईत आता दोन्ही पक्षात चांगलीच जुंपली आहे.

शहरातील या उड्डाणपुलाच्या उभारणी साठी आम्ही मागणी करीत असताना तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे योगदान मोठे असून त्यांनी या उड्डाणपुलास मंजुरी देऊन भूमिपूजन केले होते. असे असताना स्थानिक आमदारांना डावलून एमएमआरडीए या पुलाचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करणार आहेत. कोरोना काळात बाहेर न पडलेले मुख्यमंत्री यांना दीड महिन्या पासून तयार असलेल्या उड्डाणपुलाच्या उदघाटना साठी वेळ मिळाला नाही त्यामुळे येथील नागरीकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असून कोरोनासाठी वेळ नसलेल्या मुख्यमंत्र्यांना ऑनलाईन लोकार्पणा साठी ही वेळ मिळू शकला नसल्याने आम्ही उड्डाणपुलाचे लोकार्पण भिवंडीकर जनतेसाठी केले असून सेना सरकार जाणून बुजून नागरिकांना वेठीस धरत असल्याचा आरोप यावेळी आमदार महेश चौघुले यांनी केला आहे. दरम्यान हा उड्डाणपूल सुरवातीपासूनच श्रेयवादाने वादग्रस्त ठरला असून सुरुवातीला भूमिपूजन सोहळ्यावर शिवसेनेने बहिष्कार टाकला होता. २०१९ मधील विधानसभा निवडणुकीनंतर समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी या उड्डाणपुलावरील एक मार्गिका सुरू करण्यासाठी खटाटोप सुरू करताच त्याची कुणकुण लागताच शिवसेनेचे माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी या उड्डाणपुलाचे लोकार्पण करून श्रेय घेण्याचा प्रयत्न केला होता. त्या नंतर उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर आज भाजपाने या उड्डाणपुलाचे लोकार्पण करून या उड्डाणपुलाचे श्रेय घेण्याचा ...पान ६ वर

# केंद्रे आणि सावंत यांचा कार्यकर्त्यांसह मनसेनेत प्रवेश



देवणी/प्रतिनिधी

उदगीर शहरातील सोमनाथपुर येथील तरुण कार्यकर्ते गोविंद केंद्रे, प्रकाश सावंत यांनी कार्यकर्त्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षांमध्ये लातुर जिल्ह्याचे उप जिल्हाध्यक्ष संजयभाऊ राठोड व दयानंद डोंगरे यांच्या नेतृत्वातखाली पक्षप्रवेश केला. महाराष्ट्रामधील एकमेव खंबीर नेतृत्व राज ठाकरे यांच्या नेतृत्व वर विश्वास ठेऊन, उदगीरच्या प्रस्थापित राजकारणाला कंटाळून व सोमनाथपुर मधील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश करत आहोत असे सर्व तरुण कार्यकर्त्यांनी यावेळी भावना व्यक्त केल्या आहे. संजय राठोड जिल्हा उपाध्यक्ष लातूर यांनी पक्षाचा ध्वज कार्यकर्ते यांच्या हातात देऊन पक्षात त्यांचा अधिकृत प्रवेश करून घेतला व संजय राठोड यांनी आपल्या भाषणामध्ये सर्व तरुण ...पान ६ वर

# एटीएम ग्राहकांची फसवणूक करणारे पोलिसांच्या जाळ्यात



विरार/प्रतिनिधी

एटीएम मधून पैसे काढणाऱ्या लोकांना मदत करण्याच्या बहाण्याने लुटणाऱ्या दोन भामट्यांना विरार पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली असून त्यांच्याकडून १ लाख ५१ हजार ६०० रुपये किमतीचे टीव्ही, एसी, होम थेटर, सोन्याची अंगठी व कॅमेरा आदी सामानासह ८३ हजारांची रोकडही जप्त करण्यात आली आहे. या गुन्हेगारांवर विरार आणि माणिकपूर पोलीस ठाण्यात ८ गुन्ह्यांची नोंद आहे. रोहित मृदुल कुमार पांडे (२८) व प्रद्युम्न राधेशाम यादव (२१) अशी त्यांची नवे असून ते दोगेही संतोष भुवन नालासोपारा येथील रहिवासी आहेत. वसई विरार परिसरात एटीएम मधून पैसे काढणाऱ्या ग्राहकांना ...पान ६ वर